डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष २ रे अंक ४ था

भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो!

ऑगस्ट २०२६ • स्वातंत्र्यदिन विशेषांक



महापशुधन वार्ता

डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक १२ वा, एप्रिल-२०२६

✦—❖—✦

**मुख्य संपादक**

**डॉ. देवेंद्र गीता सुरेश जाधव**

सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११०६७

**सहसंपादक**

**डॉ. प्रशांत प्रमिला दयाराम भड**

उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध,
पुणे-४११०६७

**वृत्तसंपादक**

**श्री. संतोष ताराबाई शिवराम पवार,**

प.प.'महापशुधन वार्ता' कक्ष तथा
जनसंपर्क अधिकारी, पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे-६७




मागील अंक वाचण्यासाठी

dahd.maharashtra.gov.in /अथवा स्कॅन करा

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

**मुख्य संपादक**

महापशुधन वार्ता कक्ष
पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११०६७

Email: mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

## या अंकात...


- पशुधन विमा योजना: मा. मंत्री, पशुसंवर्धन
- मा. सचिव (पदुम) यांचा फ्रान्स दौरा: पशुसंवर्धनविषयक वृत्तांत
- मा. सचिव (पदुम) यांचे हस्ते लसीकरण मोहिमेस प्रारंभ
- मा. सचिव (पदुम) यांची बदक पैदास केंद्राला भेट
- मा. आयुक्त यांचा स्ट्रॅटेजिक लीडरशीप प्रशिक्षणार्थींशी संवाद
- मा. आयुक्त महोदयांचा चंद्रपूर, गडचिरोली दौरा
- 1962 हेल्पलाइन व व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉटद्वारे पशुवैद्यकीय सेवांना गती
- 'रात्रीची धाव... एका मुक्या वन्यजीवासाठी केलेला संघर्ष'
- चितापूर: पशुवैद्यकीय पथकाच्या तत्परतेमुळे शेळीला जीवनदान
- रांजणी : 'शेळी सखी' निवासी प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन
- अंबाजोगाई: पाच दिवसीय प्रशिक्षण उत्साहात
- महागड्या 'दिलशान' वर यशस्वी उपचार
- मगोप्रनिप्रा: 59 खाजगी सेवादात्यांना प्रमाणपत्रांचे वाटप
- मानवत: प्रशिक्षण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद
- प्राणीजन्य आजारांविषयी जनजागृतीचा संदेश
- लसीकरणातून पशुरोगमुक्त महाराष्ट्राकडे वाटचाल
- पशुपालक ते उद्योजक: डेअरीचे सीईओ बना
- मुरघास: टंचाईच्या काळातील संजीवनी
- चाऱ्यावरील एन्झाईम (विकर) प्रक्रिया
- फॉडर ब्लॉक: चारा टंचाईवरील आधुनिक पर्याय
- कासदाह: प्रतिबंध व तांत्रिक व्यवस्थापन
- लसीकरण: कालबद्ध कार्यक्रम
- एफएमडी: नेटवर्क प्रयोगशाळांची 33 वी पुनरावलोकन बैठक
- मानेगाव बाजार शेळी संकलन केंद्रास भेट
- लिंग विनिश्चित रेतमात्रा व भ्रुण प्रत्यारोपण





**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनांची माहिती मिळवण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा.**

**राज्यस्तरीय योजना**

**जिल्हास्तरीय योजना**

**पशुवैद्यकीय सेवेसाठी डायल करा 1962**
**व्हॉट्स् अप चॅटबॉट**
**9063142299**

**व्हॉट्स अप चॅटबॉट**




हवामानातील अनपेक्षित बदल, नैसर्गिक आपत्ती, गंभीर आजारपण किंवा संसर्गजन्य रोगांमुळे पशुधनाची होणारी हानी ही केवळ प्राण्यांची हानी नसून, ग्रामीण कुटुंबाच्या आर्थिक पायावरच मोठा आघात असते. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. एखादे दुभते जनावर किंवा शेळी-मेंढी अचानक दगावल्यास पशुपालक आर्थिक संकटात सापडतो व अनेकदा कर्जबाजारी होतो. या पार्श्वभूमीवर, राज्यातील प्रत्येक पशुपालकाला शाश्वत आर्थिक स्थैर्य व विमा संरक्षण मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र पुरस्कृत 'राष्ट्रीय पशुधन अभियाना' (NLM) अंतर्गत 'पशुधन विमा योजना' सुधारित स्वरूपात व अधिक व्यापक दराने लागू केली आहे.

## योजनेची पार्श्वभूमी व मुख्य उद्दिष्टे

महाराष्ट्र हे कृषी व पशुपालनात अग्रेसर राज्य आहे. परंतु, अलिकडच्या काळात हवामान बदलामुळे उद्भवणारे आव्हान, लंपी स्किन डिसीज, घटसर्प यांसारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव, तसेच पूर, वीज पडणे, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. अशा आपत्कालीन परिस्थितीत पशुपालकांना त्वरीत आर्थिक नुकसानभरपाई मिळावी, त्यांचे आर्थिक स्थैर्य कायम राहावे व त्यांना कर्जबाजारी होण्यापासून वाचवावे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत ही सर्वसमावेशक योजना अंमलात आणली जात आहे.

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ (MLDB), नागपूर यांच्या माध्यमातून राज्यभरात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली जात असून, स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे Agriculture Insurance Company of India Ltd. (AIC) या अधिकृत विमा कंपनीची निवड करण्यात आली आहे.

## योजनेचे प्रमुख वैशिष्ट्ये व प्रीमियम रचना

या योजनेमध्ये राज्यातील पशुपालकांसाठी अत्यंत सुलभ व सवलतीच्या दरात विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे:

1. ८५% शासकीय अनुदान: विमा हप्त्याच्या (Premium) एकूण रक्कमेपैकी ८५% रक्कम शासन (केंद्र ६०% व राज्य ४०%) भरणार आहे. पशुपालकाला केवळ १५% नाममात्र हिस्सा द्यावा लागेल.
2. कुटुंब मर्यादा: एका कुटुंबातील कमाल १० पशुधनासाठी या अनुदानाचा लाभ घेता येईल. (१० पेक्षा जास्त जनावरांसाठी १००% प्रीमियम भरून विमा उतरवता येईल).
3. विमा कालावधी: पशुपालकाच्या गरजेनुसार १ वर्ष, २ वर्षे किंवा ३ वर्षांपर्यंतचा विमा पर्याय उपलब्ध आहे.

## मंजूर प्रीमियम दर (विमा हप्ता)

शासनाने निविदा प्रक्रियेअंती मंजूर केलेले प्रीमियम दर खालीलप्रमाणे अत्यंत वाजवी आहेत:

| पशुधनाचा प्रकार | विम्याचा कालावधी | केंद्र निर्धारीत दर | महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेला दर (AIC) |
|---|---|---|---|
| देशी व संकरित दुधाळ गाई / म्हशी, बैल / रेडे, शेळ्या व मेंढ्या | १ वर्ष | ४.५०% | ४.३०% |
| | २ वर्षे | ८.००% | ७.५०% |
| | ३ वर्षे | १०.५०% | १०.५०% |

## पशुधनाचे मूल्यनिर्धारण व कमाल संरक्षित रक्कम

पशुधनाचे मूल्य हे शासकीय पशुवैद्यकीय अधिकारी व विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सध्याच्या बाजारभावानुसार निश्चित केले जाईल.

•दुभती गाय: प्रति लिटर प्रतिदिन दूध उत्पादनासाठी रु. ३,००० प्रमाणे (कमाल संरक्षित रक्कम रु. ७०,०००/-)
•दुभती म्हैस: प्रति लिटर प्रतिदिन दूध उत्पादनासाठी रु. ४,००० प्रमाणे (कमाल संरक्षित रक्कम रु. ८०,०००/-)
•बैल व रेडे: अनुक्रमे कमाल संरक्षित रक्कम रु. ७०,०००/- व रु. ८०,०००/-
•शेळी / मेंढी: कमाल संरक्षित रक्कम रु. ७,०००/- प्रति जनावर






### पारदर्शक अंमलबजावणी व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

योजनेमध्ये पूर्ण पारदर्शकता राहावी व क्लेम निकाली काढताना विनाकारण विलंब होऊ नये, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्यात आला आहे:

•भारत पशुधन प्रणाली (NDLM): विम्यासाठी पात्र जनावरांची १२ अंकी इअर टॅगद्वारे राष्ट्रीय डिजिटल प्रणालीवर (NDLM) नोंदणी असणे बंधनकारक आहे.
•सुलभ मोबाईल ॲप व डिजिटल पोर्टल: विमा अर्ज, क्लेम ट्रॅकिंग व अर्जाची सद्यस्थिती पाहण्यासाठी विमा कंपनी मराठी व इंग्रजी भाषेत समर्पित पोर्टल व ॲप उपलब्ध करून देईल.
•थेट बँक खात्यात भरपाई (DBT): सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अवघ्या १५ दिवसांच्या आत विम्याची रक्कम थेट पशुपालकाच्या आधार-संलग्न बँक खात्यात जमा केली जाईल.
•दंड: 15 दिवसांत क्लेम निकाली न काढल्यास विमा कंपनीला १२% वार्षिक व्याजासह अतिरिक्त भरपाई पशुपालकाला द्यावी लागेल.

## विमा दावा (Claim) प्रक्रिया व नियमावली

• **तातडीची सूचना:** जनावराचा आजार अथवा अपघाताने मृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीला मोबाईल ॲप, टोल-फ्री क्रमांक किंवा ई-मेलद्वारे कळवणे आवश्यक आहे.
• **'नो टॅग नो दावा':** जनावराच्या कानात वैध इअर टॅग असणे अनिवार्य आहे. टॅग गहाळ झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीस कळवून नवीन टॅगिंग करून घेणे गरजेचे आहे.
• **नैसर्गिक आपत्ती:** पूर, वीज पडणे किंवा अपघातात मृतदेहाचा पंचनामा करण्यासाठी स्थानिक पशुवैद्यकीय अधिकारी, ग्रामसेवक व तलाठी यांचा संयुक्त पंचनामा / पोलीस एफआयआर (FIR) आवश्यक राहील.

## त्रिस्तरीय तक्रार निवारण यंत्रणा

विमा दावा नाकारल्यास किंवा तक्रार असल्यास प्रादेशिक स्तरावर सह-आयुक्त (पशुसंवर्धन) यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक नियंत्रण समिती व राज्य स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी (MLDB, नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समित्या ३० दिवसांच्या आत अर्जाचा फेरविचार करून निर्णय देतील.

सर्व शेतकरी व पशुपालक बांधवांना आवाहन आहे की, त्यांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा व आपल्या मौल्यवान पशुधनाला आजच सुरक्षा कवच देऊन आपला व्यवसाय सुरक्षित करावा.



सह्याद्री अतिथीगृह, मुंबई -३२ येथे मा. मंत्री

## पंकजा मुंडे

यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित प्रशासकीय घटक उपस्थित होते. या बैठकीत पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, विभागाचे सद्यःस्थितीतील कामकाज तसेच प्रलंबित विषयांचा सविस्तर व सखोल आढावा घेण्यात आला.

"शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीमध्ये पशुपालन व्यवसायाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे पशुपालक व शेतकरी बांधवांच्या हिताला **सर्वोच्च प्राधान्य देऊन अधिक तत्परतेने काम करावे,** असे आवाहनही मा. मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी केले.





पशुपालक व शेतकरी बांधवांचे कल्याण हेच राज्य शासनाचे प्रमुख ध्येय असून, पशुसंवर्धन विभागाच्या सर्व योजनांची अधिक गतिमान व प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना द्यावी, असे निर्देश पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी या बैठकीच्या माध्यमातून विभागाला दिले.




# मा. सचिव (पदुम) यांचा फ्रान्समधील पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय अभ्यास दौरा

पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-67

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी फ्रान्स देशाचा अधिकृत अभ्यास दौरा यशस्वीरीत्या पूर्ण केला. राज्यातील पशुसंवर्धन, दुग्धोत्पादन व मत्स्यव्यवसाय क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, प्रगत पैदास पद्धती व शाश्वत व्यवस्थापन प्रणाली लागू करण्याच्या दृष्टीने हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या अभ्यास दौऱ्या दरम्यान मा. सचिव महोदयांनी फ्रान्समधील प्रमुख पशुप्रजनन केंद्र, आधुनिक डेअरी फार्म्स, दुग्ध प्रक्रिया उद्योग, तसेच किनारपट्टी व भूजलावर आधारित मत्स्यव्यवसाय प्रकल्पांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.










**अभ्यास दौऱ्यातील प्रमुख मुद्दे व क्षेत्रे:**

**प्रगत पशुपैदास तंत्रज्ञान:** फ्रान्समधील उच्च दर्जाच्या पशुवंशाचा विकास, कृत्रिम रेतन तंत्रज्ञान, व अनुवंशिक सुधारणेच्या आधुनिक पद्धतींचा सखोल अभ्यास करण्यात आला.

**दुग्ध व्यवसाय व प्रक्रिया उद्योग:** दुग्ध उत्पादकता वाढवण्यासाठी स्वयंचलित डेअरी व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण, दुग्धजन्य पदार्थांचे मूल्यवर्धन व कोल्ड चेन मॅनेजमेंट यावर विशेष चर्चा झाली.

**आधुनिक मत्स्यव्यवसाय प्रणाली:** फ्रान्समधील प्रगत मत्स्यपालन तंत्रज्ञान, सागरी मत्स्यव्यवसाय व्यवस्थापन, तसेच मत्स्योत्पादन साठवणूक व प्रक्रियेच्या आंतरराष्ट्रीय मानकांची पाहणी करण्यात आली.

**संशोधन व संस्थात्मक सहकार्य:** फ्रान्समधील संबंधित संशोधन संस्था व तंत्रज्ञान तज्ज्ञांशी संवाद साधून राज्यातील शेतकरी व पशुपालकांसाठी आधुनिक तंत्रज्ञान कसे उपलब्ध करून देता येईल, यावर भर देण्यात आला. याबाबत सहकार्य करण्याची तयारी फ्रान्समधील संबंधित तज्ज्ञांनी दर्शविली.







**राज्यातील क्षेत्रासाठी फायदेशीर ठरणारे धोरणात्मक निर्णय:**

•**तंत्रज्ञान हस्तांतरण:** फ्रान्समधील प्रगत तंत्रज्ञान महाराष्ट्रातील स्थानिक परिस्थितीनुसार अंगीकारण्यासाठी आराखडा तयार केला जाईल.

•**पशुपालक व शेतकऱ्यांचे सक्षमीकरण:** आधुनिक पद्धतींचा वापर करून राज्यातील दुग्धोत्पादक व मत्स्यपालकांचे उत्पन्न वाढवणे व उत्पादनाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणे हे या दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

मा. सचिव यांच्या या अभ्यास दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाला नवी दिशा मिळून येत्या काळात नवीन उपक्रम व धोरणे राबवण्यास गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.







# फ्रान्समधील मत्स्यव्यवसायाशी संबंधित क्षणचित्रे





नागपूर: येथील भटक्या-गुराखी रबारी समाजातील शेळ्या-मेंढ्यांमध्ये होणाऱ्या तोंडखुरी व पायखुरी (एफएमडी) रोगाच्या नियंत्रणासाठी एका अभूतपूर्व लसीकरण मोहिमेचा भव्य प्रारंभ करताना राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) समवेत पशुवैद्यकीय अधिकारी व पशुपालक.

# स्थलांतरित रबारी समाजाच्या मेंढ्यांसाठी नागपुरात विशेष पशु आरोग्य व लसीकरण मोहीम; ५० हजार मेंढ्यांच्या लसीकरणाचे उद्दिष्ट

नागपूर: पशुसंवर्धन विभाग व सेंटर फॉर पिपल्स कलेक्टीव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे स्थलांतरीत रबारी समाजाच्या मेंढ्यांसाठी विशेष पशु आरोग्य, लसीकरण व जंतनाशन अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या हस्ते करण्यात आला.

सध्या नागपूर परिसरात स्थलांतरित रबारी समाजाच्या सुमारे 20 ते 25 हजार मेंढ्या तात्पुरत्या वास्तव्यास आहेत. हे कळप वर्षभर विदर्भातील विविध भागांत स्थलांतर करत असतात. त्यामुळे एफएमडी (FMD), पीपीआर (PPR) व शीप पॉक्स यांसारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखणे व मेंढ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे या उद्देशाने ही मोहीम राबवली जात आहे. मोहिमेदरम्यान मेंढ्यांची आरोग्य तपासणी, एफएमडी प्रतिबंधक लसीकरण, जंतनाशन व आवश्यक मोफत उपचार करण्यात येत आहेत.

यंदा नागपूर विभागात स्थलांतरित पशुपालकांच्या सुमारे 50,000 मेंढ्यांचे लसीकरण व जंतनाशन करण्याचे नियोजन आहे. स्थलांतरित पशुपालकांच्या मेंढ्यांमधील मृत्युदर कमी करणे, आर्थिक नुकसान टाळणे व संसर्गजन्य पशुरोगांवर नियंत्रण मिळवण्याच्या दृष्टीने हे अभियान मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास प्राधिकरणाकडून व्यक्त करण्यात आला आहे. प्रादेशिक सहआयुक्त (नागपूर) डॉ. सतीश राजू यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपायुक्त डॉ. नितीन फुके, सहायक आयुक्त डॉ. सुबोध नंदागवळी व पशुवैद्यकीय पथकाने प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. तसेच 'सेंटर फॉर पीपल्स कलेक्टिव्ह'चे संचालक सजल कुलकर्णी व अजिंक्य शहाणे यांनी संस्थात्मक व क्षेत्रीय समन्वय साधला.

रबारी समूहाचे प्रमुख कारसनभाई यांच्या नेतृत्वाखाली विविध राज्यांत स्थलांतरित होण्यापूर्वी सुमारे सत्तर समूह नागपुरात एकत्र आले आहेत. या दुर्मिळ वार्षिक एकत्रीकरणाचा साधून पुढील तीन ते चार दिवसांत सुमारे 20 हजार लहान जनावरांना लसीकरणाचे सुरक्षा कवच दिले जाणार आहे. पशुसंवर्धन विभाग, सेवाभावी संस्था आणि समाज घटकाची अभूतपूर्व एकजूट असलेली ही मोहीम म्हणजे उत्तम समन्वयाचे एक आदर्श उदाहरण ठरली आहे. मोबाइल युनिट आणि पॉलीक्लिनिकच्या माध्यमातून डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांचे पथक थेट गोठ्यांपर्यंत पोहोचून लसीकरण पूर्ण करत आहे. याशिवाय, प्रशासन आणि समाज यांच्यात दुवा म्हणून काम करणारे सीपीसी सदस्य अजिंक्य शहाणे आणि साजल कुलकर्णी यांनी या सामुदायिक एकजुटीत मोलाची भूमिका बजावली.











# मा. सचिव (पदुम) यांची वडसा येथील बदक पैदास प्रक्षेत्रास भेट
## पिल्लांचे उत्पादन वाढवण्याचे निर्देश

वडसा: मा. सचिव महोदय यांनी 20 जुलै 2026 रोजी वडसा येथील बदक पैदास प्रक्षेत्रास (जिल्हा गडचिरोली) भेट देऊन पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी प्रक्षेत्रावरील बदक पिल्लांचे उत्पादन वाढवण्यासाठी तात्काळ आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणी दौऱ्यावेळी अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य मा. शीतलकुमार मुकणे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, गडचिरोली मा. डॉ. मठवाले, सहाय्यक आयुक्त (शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, वडसा) मा. जितेश कुमरे आणि बदक पैदास प्रक्षेत्राचे पशुधन विकास अधिकारी डॉ. लोकनाथ नागदेवते यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रक्षेत्रावर बदक पिल्लांच्या उत्पादनात भरघोस वाढ करून बदक पालनाचा फायदा जास्तीत जास्त पशुपालकांपर्यंत कसा पोहोचवता येईल, यावर भर देण्याच्या सूचना सचिव महोदयांनी दिल्या. प्रक्षेत्राचे कामकाज अधिक सक्षम व वेगाने चालण्यासाठी आवश्यक ते पुरेसे मनुष्यबळ तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. या भेटीमुळे प्रक्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.



# नागपूर: 'विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पा'ची महत्त्वपूर्ण बैठक





पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-67

विदर्भ व मराठवाडा क्षेत्रातील दुग्धव्यवसायाला गती देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पा'ची महत्त्वपूर्ण बैठक आयुक्त, पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीमध्ये प्रकल्पांतर्गत निश्चित करण्यात आलेली भौतिक व आर्थिक लक्ष्यांक उद्दिष्टे व सध्या सुरू असलेल्या प्रागतिक कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना थेट लाभ पोहोचवून त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे व विभागातील दुग्ध व्यवसायाचे सक्षमीकरण करणे, यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

**प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये व ठळक बाबी:**

•हा प्रकल्प महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (NDDB) यांच्या संयुक्त विद्यमाने राबवला जात आहे.

9 सर्वसमावेशक घटक: दुग्धव्यवसाय विकासाच्या दृष्टीने प्रकल्पात 9 महत्त्वाच्या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

•आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणांचे सहाय्य: शेतकऱ्यांना आधुनिक पशुपालन पद्धतींचा अवलंब करण्यासाठी व आवश्यक उपकरणांच्या खरेदीसाठी मदत पुरवली जात आहे.

पारदर्शक डिजिटल अर्ज प्रणाली: अर्जांची प्रक्रिया व लाभ वाटप अधिक सुलभ व पारदर्शक करण्यासाठी डिजिटल ॲप्लिकेशन प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे.

•थेट लाभ हस्तांतरण (DBT): योजनेचे आर्थिक अनुदान कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात (DBT) जमा केले जाते.

•उत्कृष्ट दुभती जनावरे व आरोग्य सेवा: शेतकऱ्यांना दर्जेदार दुभती जनावरे उपलब्ध करून देणे तसेच वेळेवर पशुवैद्यकीय काळजी व आरोग्य सुविधा पुरवणे.

•शेतकरी प्रशिक्षण व क्षमता वाढ: दुग्ध उत्पादकांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

•रिअल-टाइम ट्रॅकिंग व देखरेख: अर्जांची सद्यस्थिती (Status) तपासण्यासाठी व कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी रिअल-टाइम ट्रॅकिंग सुविधा उपलब्ध आहे.

•न्याय्य साधनसामग्री वाटप: सर्व पात्र लाभार्थ्यांना पारदर्शक व समान पद्धतीने संसाधनांचे वाटप निश्चित केले गेले आहे.

बैठकीच्या शेवटी आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी प्रकल्पाची उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले, ज्यामुळे विदर्भ व मराठवाड्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेचा प्रत्यक्ष फायदा मिळू शकेल.

# पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी 'स्ट्रॅटेजिक लीडरशिप' प्रशिक्षण



नागपूर: मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी 'Strategic Leadership Training Program' या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM), नागपूर येथे करण्यात आले होते. पशुसंवर्धन विभागाचे व्यवस्थापन अधिक प्रभावी व आधुनिक करण्यासाठी, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील नेतृत्वगुण व धोरणात्मक कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आल्याची माहिती मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली.







# चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांतील पशुवैद्यकीय संस्थांना मा. आयुक्तांची भेट





**चंद्रपूर:** जिल्ह्यातील विविध पशुवैद्यकीय व दुग्धविकास संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या कामकाजाचा मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दि. 25 जुलै 2026 रोजी सखोल आढावा घेतला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी चिमूर, मूल, सावली व ब्रह्मपुरी येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयांना भेट दिली. तसेच सावली तालुक्यातील व्याहाड व नागभीड तालुक्यातील मेंढा येथील दूध संकलन केंद्रे व राष्ट्रीय पशुधन अभियाना (NLM) अंतर्गत ब्रह्मपुरी तालुक्यातील अड्याळ येथील शेळीपालन प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी केली.

भेटीदरम्यान डॉ. किरण पाटील यांनी पशुसंवर्धन व दुग्धविकास योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक ते निर्देश दिले. तसेच स्थानिक पशुपालकांशी थेट संवाद साधून आधुनिक पशुपालन पद्धती, पशू आरोग्य व लसीकरण, दुग्ध व्यवसाय वाढ व शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पशुसंवर्धन विभागाच्या सेवा अधिक प्रभावीपणे व वेगाने नागरिकांपर्यंत पोहोचवण्यावर त्यांनी विशेष भर दिला.



गडचिरोली जिल्ह्यातील पशुसंवर्धन विषयक कामांचा आढावा घेताना मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी अधिकारी वर्गास आवाहन केले की, "गडचिरोली सारख्या भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक व दुर्गम क्षेत्र असलेल्या जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागाचे कार्य केवळ तांत्रिक सेवांपुरते मर्यादित नसून, ते येथील आदिवासी व ग्रामीण बांधवांच्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे एक प्रमुख माध्यम आहे. या जिल्ह्यात काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी अधिक संवेदनशील व महत्त्वाची ठरते. जिल्ह्यातील पशुपालनाचा दर्जा उंचावण्यासाठी व पशुपालकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी काही विशिष्ट मुद्द्यांवर तातडीने व प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यामध्ये, लंपी चर्मरोग (LSD), एफएमडी (FMD) व पीपीआर (PPR) यांसारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्ह्यातील अतिदुर्गम, जंगलव्याप्त व सीमेवरील गावांपर्यंत 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना', 'राष्ट्रीय पशुधन अभियान' (NLM) व 'किसान क्रेडिट कार्ड' (KCC) यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ गडचिरोलीतील आदिवासी बांधवांना पोहोचवला पाहिजे.









पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७

लाळखुरकूत या घातक विषाणूजन्य रोगापासून राज्यातील पशूधनाचे रक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'लाळखुरकूत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-९' चे आयोजन करण्यात आले आहे. ही लसीकरण मोहीम येत्या १३ ऑगस्ट २०२६ पासून राज्यभरात सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेसाठी १ कोटी लसमात्रा  केंद्र शासनाकडून राज्यस्तरावर प्राप्त झाल्या आहेत.

*लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम राज्यभरात वेळेत व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रत्यक्ष लसीकरण सुरू होण्यापूर्वी सर्व जिल्ह्यांपर्यंत लस साठा पोहोचणे आवश्यक आहे. उपलब्ध झालेला १ कोटी लसींचा पुरवठा राज्यातील सर्व जिल्ह्यांना शीत साखळीची खबरदारी घेऊन वितरित (वाटप) करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या मोहिमेमुळे राज्यातील कोट्यवधी पशूधनाला लाळखुरकत रोगापासून संरक्षण मिळणार असून, पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

"राज्यातील पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे यासाठी 'लाळखुरकत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-9' अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये 13 ऑगस्टपासून ही मोहीम व्यापक स्वरूपात राबवली जाईल. सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे 100% लसीकरण करून घेऊन या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा."

मा. डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.),
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य

परिणामकारक लसीकरण् होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंतनिर्मुलन करण्यात येत असून, आवश्यक औषधींचा पुरवठा सर्व संस्थांना करण्यात आला आहे. महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत पशुधनाला एफएमडी लसीकरण करून त्याची नोंद NDLM वर घेतल्यास प्रती पशुधन रु. ५/- प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.






## 1962 हेल्पलाइन व व्हॉट्सअॅप चॅटबॉटद्वारे राज्यातील पशुवैद्यकीय सेवांना गती

पुणे : राज्यातील पशुपालकांना घरपोच पशुवैद्यकीय सेवांचा लाभ मिळवून देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कार्यान्वित केलेल्या 1962 कॉल सेंटर व व्हॉट्स अप चॅटबॉट सेवेला पशुपालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. जुलै-2026 मध्ये राज्यातील 35,068 पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात आली असून, व्हॉट्स अप चॅटबॉटच्या माध्यमातून 599 पशुपालकांना ऑडियो-व्हिडिओच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवांचा लाभ देण्यात आला आहे.

पशुपालकांना अधिक जलद व तात्काळ सेवा देण्यासाठी 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सेवेला पशुपालकांचा मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकरी 9063142299 या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर "Hi" पाठवून किंवा QR कोड स्कॅन करून ही सेवा मिळवू शकतात.

माहे जुलै-2026 मध्ये 1962 या कॉल सेंटर क्रमांकावर आतापर्यंत 35,068 पशुपालकांनी संपर्क साधला असून, त्यातील योजना व इतर पशुसंवर्धन विषयक माहितीचे कॉल वगळता 31,755 पशुपालकांना मोबाईल व्हेटर्नरी क्लिनीकच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवांचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच व्हॉट्स अप चॅटबॉट सेवेच्या माध्यमातून 599 पशुपालकांनी संपर्क साधला, ज्यामध्ये 145 पशुपालकांना व्हिडिओ कॉलद्वारे मार्गदर्शन व पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या तर उर्वरीत 454 पशुपालकांना ऑडिओद्वारे टेलिकन्सल्टेशनची सुविधा पुरविण्यात आली.

# 'रात्रीची धाव... एका मुक्या वन्यजीवासाठी केलेला शेवटपर्यंतचा संघर्ष'

पशुचिकित्सालयात एक अत्यंत गंभीर प्रसंग ओढावला. पोटात गंभीर दुखापत होऊन आतडे बाहेर आलेल्या अवस्थेत माकडाचे एक लहान पिल्लू उपचारासाठी आणले गेले. त्याच्या अंगातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याने प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता.



मध्यरात्रीचे साडेबारा वाजले होते. माहिती मिळताच सहाय्यक आयुक्त डॉ. विनोद तानाजी पाटील व डॉ. शिवानी तात्याराव कनले (शालगाव) यांनी वेळेची पर्वा न करता तात्काळ दवाखान्यात धाव घेतली. रात्रीच्या अंधारात आपत्कालीन शस्त्रक्रिया सुरू झाली. डॉक्टरांनी अत्यंत नाजूकपणे आतडे पूर्ववत पोटात बसवून जखम व्यवस्थित टाके घालून बंद केली. शस्त्रक्रियेनंतर सर्व आवश्यक वैद्यकीय उपचार देऊन पिल्लाचा जीव वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न झाले. मात्र, अतिरक्तस्राव व गंभीर अंतर्गत दुखापतीमुळे अखेर त्या मुक्या जिवाची प्राणज्योत मालवली.

यश-अपयश वैद्यकीय शास्त्राचा भाग असला, तरी कठीण प्रसंगी दाखवलेली ही कर्तव्यनिष्ठा व सेवाभाव पशुवैद्यकीय व्यवसायाची खरी ताकद दर्शवतो. जखमी वन्यजीव आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, जेणेकरून वेळेवर उपचार मिळून एखाद्या जिवाचे प्राण वाचू शकतील. तसेच सर्व पशुवैद्यकीय सेवांसाठी 1962 या कॉल सेंटर व 9063142299 या मोबाईल क्रमांकावर व्हॉट्स अप चॅटबॉट सेवेसाठी संपर्क साधावा, असे आवाहन विभागातर्फे करण्यात आले आहे.









महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत परिवर्तन लोकसंचालित साधन केंद्र कवठेमंकाळ यांना स्मार्ट प्रकल्प अंतर्गत प्रक्षेत्र उत्पादित बोकड वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. अजयनाथ थोरे, श्री. शिनगारे, वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी सांगली सौ. प्रियांका अर्जुन, पंचायत समिती सदस्य रांजणी व अधिकारी उपस्थित होते.

# चितापूर येथे शेळीवर यशस्वी सिजेरियन शस्त्रक्रिया; पशुवैद्यकीय पथकाच्या तत्परतेमुळे शेळीला जीवनदान



**चितापूर (ता. कुही, जि. नागपूर) :** येथे एका शेळीला प्रसूतीदरम्यान गंभीर अडचण निर्माण झाल्याने तिच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. घटनेची माहिती मिळताच तात्काळ पशुधन विकास अधिकारी डॉ. हर्षल नीलकंठ रेवतकर (पशुवैद्यकीय दवाखाना, तितूर) व पशुधन पर्यवेक्षक श्री. सारंग राऊत यांनी चितापूर गाठले. तपासणीदरम्यान नैसर्गिक प्रसूती अशक्य असल्याचे लक्षात आल्यावर तातडीने सिजेरियन शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. प्रतिकूल परिस्थिती व मर्यादित साधनसामग्रीत पथकाने ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. प्रसूतीदरम्यान मृत पिल्लाला बाहेर काढून शेळीचे प्राण वाचवण्यात यश आले. योग्य वेळी मिळालेली माहिती, समाजसेवक वामन श्रीरामे यांचे सहकार्य व पशुवैद्यकीय पथकाची तत्परता यामुळे एका मुक्या जीवाचा प्राण वाचल्याने शेतकरी कुटुंब व गावकऱ्यांनी समाधान व्यक्त करत पथकाचे आभार मानले.

---

**अहिल्यानगर:** शेवगाव तालुका येथे पशुसंवर्धन विभागाच्या वतीने 'वंध्यत्व निवारण शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. लामखेडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



---



**अकोला:** पशुवैद्यकीय दवाखाना, मल्हारा अंतर्गत ग्रामपंचायत धोतरखेडा येथे लम्पी स्किन डिसीज (LSD) लसीकरण जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात कृषी महाविद्यालय, अकोला व कृषी संशोधन केंद्र, अचलपूर यांच्या RAWE & AIA 2026-27 कार्यक्रमातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी पशुपालकांना लम्पी स्किन डिसीज या संसर्गजन्य रोगाची लक्षणे, प्रसाराची कारणे, रोगामुळे होणारे आर्थिक नुकसान तसेच वेळेवर लसीकरणाचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ, पशुपालक तसेच कृषी विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. या जनजागृती उपक्रमामुळे पशुपालकांमध्ये लम्पी रोग प्रतिबंध व लसीकरणाबाबत प्रभावी जनजागृती झाली.



# रांजणी (सांगली) प्रक्षेत्रावर 'शेळी सखी' निवासी प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन; प्रशिक्षणार्थींकडून खुर्च्यांची भेट

**रांजणी:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळाच्या रांजणी (जि. सांगली) येथील शेळी-मेंढी प्रक्षेत्रावर नुकतेच 'माणदेशी फाउंडेशन'च्या शेळी सखींसाठी निवासी तांत्रिक शेळी व मेंढी पालन प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गांतर्गत शेळी सखींना आधुनिक व तांत्रिक व्यवस्थापनाचे सविस्तर धडे देण्यात आले.

### कृतज्ञता म्हणून प्रशिक्षणार्थींकडून प्रक्षेत्राला भेट

प्रशिक्षणादरम्यान मिळालेले दर्जेदार ज्ञान व प्रक्षेत्रावरील उत्तम सोयी-सुविधांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, उपस्थित शेळी सखी प्रशिक्षणार्थींच्या वतीने प्रक्षेत्रासाठी २५ नग खुर्च्या भेट म्हणून देण्यात आल्या. महिलांचा हा उपक्रम प्रक्षेत्राच्या सुशोभीकरणात व सुविधेत भर घालणारा ठरला आहे. या कार्याबद्दल शेळी सखी प्रशिक्षणार्थींचे प्रक्षेत्र अधिकारी व कर्मचारी वर्गाने आभार मानत प्रशिक्षणार्थींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### माहिती फलकांचे (फ्लेक्स) नूतनीकरण

प्रक्षेत्रावर शेतकरी व पशुपालकांच्या मार्गदर्शनासाठी ५ वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेले माहिती फलक खराब झाले होते. यामध्ये प्रक्षेत्रावरील लसीकरण, लोकर कातरणी, प्राण्यांचा विमा व कृत्रिम रेतन (Artificial Insemination) यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या तांत्रिक बाबींचा समावेश होता. पशुपालकांना अचूक माहिती मिळावी या उद्देशाने हे सर्व जुने फ्लेक्स आता नव्याने प्रिंट करून प्रक्षेत्रावर आकर्षक पद्धतीने लावण्यात आले आहेत.



**प्रक्षेत्राचा कायापालट: रंगरंगोटीने परिसर सुशोभित**

प्रशिक्षणाच्या निमित्ताने व प्रक्षेत्राच्या देखभालीचा भाग म्हणून परिसराच्या सुशोभीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. प्रक्षेत्राच्या मुख्य रस्त्यावरील खालील प्रमुख ठिकाणांना नव्याने रंग देऊन त्यांचा चेहरामोहरा बदलण्यात आला आहे:

- गेट क्रमांक २ व गेट क्रमांक ३
- प्रक्षेत्राचे मुख्य कार्यालय व रेस्ट हाऊस
- दूध मंदिर
- लॅब प्रवेश गेट (प्रयोगशाळा मुख्य मार्ग)

या रंगरंगोटीमुळे संपूर्ण प्रक्षेत्राचा परिसर अत्यंत प्रसन्न व आकर्षक दिसत असून, प्रशिक्षणार्थी व भेट देणाऱ्या पशुपालकांकडून या बदलांचे कौतुक होत आहे. या प्रशिक्षणामुळे ग्रामीण भागातील शेळी सखींना रोजगाराच्या व तांत्रिक ज्ञानाच्या नव्या दिशा मिळाल्या आहेत.







**वालूर (जि.परभणी):** येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात लंपी प्रतिबंधात्मक लसीकरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या मोहिमेमध्ये रावे (RAWE) प्रकल्पांतर्गत 'कृषी' विद्यार्थ्यांचाही सक्रिय सहभाग होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा परिषद सदस्य साडेगावकर यांच्या उपस्थितीत, डॉ. दीपक धर्माधिकारी यांनी पशुपालक व विद्यार्थ्यांना पशुधनाचे आरोग्य, विविध आजारांची लक्षणे व लसीकरण करण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.




**नायगाव (जिल्हा नांदेड):** तालुका पशुचिकित्सालय, नायगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय कुक्कुटपालन प्रशिक्षणाचा उत्साहात समारोप झाला. या प्रशिक्षणात पशुपालक व बेरोजगार तरुणांना कुक्कुटपालनाचे आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन व व्यवसायाच्या संधींविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



**पडेगाव:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पडेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचा यशस्वी समारोप झाला. 23 ते 25 जून 2026 या कालावधीत चाललेल्या या प्रशिक्षणामध्ये तब्बल 432 प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. या तीन दिवसांत तज्ज्ञांमार्फत शेळ्यांच्या प्रगत जाती, त्यांचे संगोपन, आहार-विहार व्यवस्थापन, रोग नियंत्रण व शासकीय योजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणाऱ्या या शेतीपूरक व्यवसायाविषयी प्रशिक्षणार्थींमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.





महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, नागपूर यांनी 1 जुलै 2026 रोजी एकल महिला सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन स्व. वसंतराव देशपांडे सभागृह, नागपूर येथे केले होते. या कार्यशाळेत सामूहिक पद्धतीने पशुसंवर्धन, वैरण लागवड, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना व KCC याबाबत जिल्हा उपआयुक्त डॉ. नितीन फुके यांनी माहिती दिली. या कार्यशाळेत जवळपास 900 महिला उपस्थित होत्या.

# अंबाजोगाईत पाच दिवसीय दुग्ध व्यवसाय, शेळीपालन व कुक्कुटपालन प्रशिक्षण उत्साहात



**अंबाजोगाई (बीड):** पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय (पंचायत समिती, अंबाजोगाई) व रोटरी क्लब, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी पाच दिवसीय दुग्ध व्यवसाय, शेळीपालन व कुक्कुटपालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन बीड जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजेश्वर कदम यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक डॉ. एस. एस. घोटे (सहाय्यक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, अंबाजोगाई) यांनी केले. त्यांनी या पाच दिवसीय प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश व रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली. उदघाटक डॉ. आर. डी. कदम यांनी आपल्या मार्गदर्शनात शासनाच्या सर्व राज्य व जिल्हास्तरीय पशुसंवर्धन योजनांची सविस्तर माहिती देऊन उपस्थितांना त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे प्राध्यापक व माजी प्रकल्प संचालक (विस्तार शिक्षण, नागपूर) डॉ. अनिल भिकाणे यांनी 'दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व शेळीपालन - एक सुवर्णसंधी' या विषयावर दोन तास सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा प्रशिक्षणार्थींना आपला व्यवसाय आधुनिक पद्धतीने सुरु करण्यासाठी मोठा फायदा होणार आहे.

व्यासपीठावर डॉ. शिवानंद मुक्कामवार (सहाय्यक आयुक्त, जिल्हा कृत्रिम रेतन, बीड), श्रीमती रोहिणी (सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती), श्री. शकील शेख (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई), श्री. राधेश्याम (सचिव, रोटरी क्लब) व प्रोजेक्ट चेअरमन डॉ. अनिल केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. या नाविन्यपूर्ण व व्यवसायभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमाला अंबाजोगाई व परिसरातील पशुपालक व प्रशिक्षणार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.




पद्मभूषण मा. खासदार बाळासाहेब विखे पाटील सभागृहात जिल्हा उपायुक्त डॉ. उमेश पाटील व सहाय्यक आयुक्त डॉ. अरूण हरिश्चंद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. यावेळी महाराष्ट्र गोवंशीय प्रजनन कायदा व 'एनडीएलएम' संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सधन कुक्कुट प्रकल्प (कोपरगाव) अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना जिल्हा उपायुक्त डॉ. उमेश पाटील व सहाय्यक आयुक्त डॉ. दशरथ दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. एनगे, डॉ. निर्मळ व इतर अधिकारी उपस्थित होते.



'स्मार्ट' योजनेअंतर्गत उस्मानाबादी बोकडांचे वाटप! भंडारा येथील बोंद्री प्रक्षेत्रावरून 'स्मार्ट' योजनेअंतर्गत शेंदूरवाफा (ता. साकोली) येथील 'महात्मा ज्योतिबा फुले फार्मर प्रोड्युसर कंपनी'ला जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांच्यामार्फत उस्मानाबादी जातीच्या बोकडांचा पुरवठा करण्यात आला. यावेळी उपस्थित अधिकारी व शेतकरी प्रतिनिधी.



**पेण:** ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पशुसंवर्धन व्यवसायाला अधिक बळ देण्यासाठी व सर्व घटकांमध्ये समन्वय साधण्यासाठी, पेण (जि. रायगड) येथे 'पशुसंवर्धन विभागाच्या भागधारकांची कार्यशाळा' (Stakeholders' Workshop) अत्यंत यशस्वीरित्या पार पडली. या कार्यशाळेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, यात पशुसंवर्धन क्षेत्राशी निगडित सर्व भागधारक एकाच छताखाली आले होते, अशी माहिती जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सचिन देशपांडे यांनी दिली.





**पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर** येथे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेत व तांत्रिक कौशल्यात वाढ करण्याच्या उद्देशाने आयोजित 'क्षमता वृद्धी प्रशिक्षण' (Capacity Building Training) कार्यक्रमाचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. आधुनिक पशुवैद्यकीय तंत्रज्ञान, क्षेत्रिय आव्हाने व उपचारांच्या नवीन पद्धती यावर या प्रशिक्षणात विशेष भर दिला



# मिरज पशुवैद्यकीय चिकित्सालयाची किमया: महागड्या 'दिलशान' वर यशस्वी उपचार, विटा येथील पशुपालकाला दिलासा!

**मिरज:** सांगली जिल्ह्यातील विटा परिसरातील प्रसिद्ध 'आर एफ गोट फार्म' (ISO मानांकित) चे मालक उमर फारुक शिकलगार यांच्या अत्यंत महागड्या व देखण्या 'दिलशान' नावाच्या बीटल जातीच्या बोकडाला मिरज येथील शासकीय पशुवैद्यकीय चिकित्सालयाने नवीन आयुष्य दिले आहे. डॉक्टरांच्या पथकाने केलेल्या यशस्वी व तातडीच्या उपचारांमुळे हा लाखो रुपयांचा बोकड आता पुन्हा एकदा आपल्या पायावर डौलाने उभा राहिला आहे.

उमर फारुक शिकलगार यांच्या आयएसओ मानांकित गोट फार्ममधील मुख्य आकर्षण असलेला 'दिलशान' हा बीटल जातीचा बोकड अत्यंत दुर्मिळ व देखणा आहे. बाजारात त्याची किंमत सुमारे दीड ते दोन लाख रुपये असल्याचा दावा शिकलगार करतात. काही दिवसांपूर्वी दिलशानच्या पायाला गंभीर क्रॅक झाल्यामुळे त्याला व्यवस्थित चालता येत नव्हते. वेदनांमुळे त्याची प्रकृती खालावत चालली होती. फार्मचे मालक शिकलगार यांनी कोणतीही जोखीम न पत्करता त्याला तातडीने मिरज येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयात दाखल केले.

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. विजयकुमार डोके व त्यांच्या तज्ज्ञ टीमने तातडीने तपासणी सुरू केली. दिलशानच्या पायाचा अचूक 'एक्स-रे' काढण्यात आला व डॉक्टरांनी तात्काळ आधुनिक वैद्यकीय पद्धतीचा वापर करून त्याच्या पायाला प्लास्टर केले. प्लास्टर केल्यानंतर दिलशानला डॉक्टरांच्या थेट देखरेखीखाली वैद्यकीय चिकित्सालयात ठेवण्यात आले होते. योग्य औषधोपचार व अचूक नियोजित काळजीमुळे थोड्याच दिवसांत दिलशानची प्रकृती पूर्णपणे सुधारली व तो पूर्वीसारखाच उत्साहाने फिरू लागला आहे. या कामगिरीबद्दल उमर फारुक शिकलगार यांनी मिरज पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले आहे.







१ नांदेड: येथील जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयात दोन अत्यवस्थ म्हशींवर डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. सुनील बळवंतकर, डॉ. राजीव तरपेवार, चिकित्सालयातील कर्मचारी व इंटरनशिपच्या विद्यार्थिनींनी 'रुमिनाटॉमी' शस्त्रक्रिया यशस्वी करून त्यांना जीवदान दिले. (मार्गदर्शन: जिल्हा उपायुक्त डॉ. सखाराम खुणे. शेतकरी: शिवानंद विभुते, मानसपुरी व साहिल ढेरे, नागठाणा).

२ नांदेड: येथील जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयात दोन अत्यवस्थ म्हशींवर डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. सुनील बळवंतकर, डॉ. राजीव तरपेवार, चिकित्सालयातील कर्मचारी व इंटरनशिपच्या विद्यार्थिनींनी 'रुमिनाटॉमी' शस्त्रक्रिया यशस्वी करून त्यांना जीवदान दिले. (मार्गदर्शन: जिल्हा उपायुक्त डॉ. सखाराम खुणे. शेतकरी: चंद्रकांत कंकाळ, खडकुत व यादोजी मोडके, वसरणी).




श्री. विकास आबा भोगे, मौजे विहापूर, ता. कडेगाव, जि. सांगली यांना सन २०२५-२६ या वर्षात पशुवैद्यकीय चिकित्सालय (स्था.) शाळगाव मार्फत शासनाच्या १००% अनुदानित वैरण विकास योजनेअंतर्गत लाल मका बियाणे वितरित करण्यात आले होते. सदर शेतकऱ्याने ५ किलो बियाण्याची १५ गुंठे क्षेत्रावर पेरणी करून त्यापासून तब्बल ९ टन दर्जेदार मुरघासाचे उत्पादन घेतले आहे. अत्यल्प क्षेत्रात व मर्यादित बियाण्यापासून इतक्या मोठ्या प्रमाणात वैरणीचे उत्पादन घेणे ही निश्चितच कौतुकास्पद व इतर पशुपालकांसाठी प्रेरणादायी बाब आहे. या यशामुळे पशुपालकांना वर्षभर हिरव्या चाऱ्याचा पर्याय उपलब्ध होऊन पशुधनाच्या पोषणात मोठी मदत होणार आहे. श्री. भोगे यांचे हे यश आधुनिक चारा व्यवस्थापन व मुरघास निर्मितीचे उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे.



**महिला सक्षमीकरणासाठी पशुसंवर्धन योजनेचे धडे!**

रामटेक तालुक्यातील महादुला येथे आयोजित विशेष शिबिरात महिला बचत गटांना 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'चे सखोल मार्गदर्शन करताना नागपूरचे जिल्हा उपायुक्त डॉ. नितीन फुके. शेजारी सहाय्यक आयुक्त डॉ. राजेश बळी, सरपंच शरद डदुरे व इतर मान्यवर.




**पशुपालकांना बळ! बासबा येथे बियाणे वाटप संपन्न**

विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत हिंगोलीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. देवकते यांच्या हस्ते बासबा येथील पशुपालक लाभार्थ्यांना बियाणे वाटप करण्यात आले. उत्कृष्ट चाऱ्याच्या उपलब्धतेमुळे दुग्ध व्यवसायाला गती मिळणार असल्याने लाभार्थ्यांनी व्यक्त केला आनंद!






**धाराशिव येथे जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयामार्फत बियाणे वाटप संपन्न!** पशुपालकांना दर्जेदार चाऱ्याची उपलब्धता व्हावी व दुग्ध व्यवसायाला चालना मिळावी यासाठी 'जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, धाराशिव' अंतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून पशुपालक लाभार्थ्यांना बियाणे वाटप करण्यात आले. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, कर्मचारी व जिल्ह्यातील पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**वळके (रत्नागिरी) येथे 'मुख्यमंत्री उद्योजकता योजने'चे मार्गदर्शन:** वळके गावात महिला बचत गटांना पशुसंवर्धन योजनांची माहिती देताना जिल्हा उपआयुक्त डॉ. दत्तात्रय झंझाड व डॉ. आदिती कसालकर. या प्रसंगी कुक्कुटपालनाचे 10 लाभार्थी निश्चित करण्यात आले, तर KCC चे 12 व कृषी समकक्ष दर्जाचे 5 प्रस्ताव मंजुरीसाठी तयार करण्यात आले. सोबत स्थानिक लोकप्रतिनिधी व विभागाचे अधिकारी.



# ढवळी येथे पशुधनासाठी त्रिस्तरीय प्रतिबंधक लसीकरण मोहीम संपन्न

पशुवैद्यकीय चिकित्सालय ढवळी व राजारामबापू दूध संघ ईश्वरपूर यांच्यातर्फे संयुक्त लसीकरण मोहीम यशस्वी! जि.प. सदस्य मा. धैर्यशील थोरात व संचालक श्री. सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत ढवळी येथे गायी-म्हशींना लम्पी, घटसर्प व फऱ्या रोगा प्रतिबंधक लस देण्यात आली. पशुधन निरोगी ठेवण्यासाठी दूध उत्पादकांनी नियमित लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



सधन कुक्कुट विकास गट, सांगली यांच्या वतीने 5 दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सांगली जिल्ह्यातील 118 प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवून आधुनिक पोल्ट्री व्यवस्थापनाचे धडे घेतले.



**महाराष्ट्र:** 'स्मार्ट' प्रकल्पांतर्गत राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींसाठी आयोजित कुक्कुटपालन प्रशिक्षण कार्यक्रमात प्रात्यक्षिकांवर विशेष भर देण्यात येत आहे. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत, आज दिनांक 16 जून रोजी प्रशिक्षणार्थींनी महाविद्यालयाच्या कुक्कुट प्रक्षेत्राला प्रत्यक्ष भेट दिली.



ग्रामीण भागातील एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी व पशुपालनाच्या माध्यमातून शाश्वत रोजगार मिळवून देण्यासाठी पेढे व अलोरे गटात प्रभागस्तरीय एकल महिला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पशुसंवर्धन विभागाच्या वतीने डॉ. संसारे व श्री. भोईर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, बिलाखेड, ता. चाळीसगाव, जि. जळगाव येथील प्रक्षेत्रावर 157 पशुपालकांना शेळी व मेंढीपालन विषयक प्रशिक्षण देण्यात आले. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक 27/07/2026 ते 29/07/2026 तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षणात एकूण 527 प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.







## 'जानवळ पश्मी' श्वान

महाराष्ट्र स्टेट बायोडायव्हर्सिटी बोर्ड व महाराष्ट्र जीन बँकेच्या संचालक श्रीमती पूनम पाटे यांनी लातूर जिल्ह्यातील जानवळ येथे भेट देऊन 'जानवळ पश्मी' श्वानांची पाहणी केली. परभणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. पंडित नांदेडकर यांच्या पुढाकाराने ही भेट आयोजित करण्यात आली होती. जानवळ पश्मी श्वान प्रजातीला राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो (NBAGR) कडे नोंदणी मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांमधील हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. पशुपालकांचा या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे.



जिंतूर (जि. परभणी) येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'चे भव्य आयोजन करण्यात आले होते. पालकमंत्री मा. मेघना बोर्डीकर, परभणीचे जिल्हाधिकारी श्री. चव्हाण, सेलू-जिंतूरचे उपजिल्हाधिकारी श्री. शैलेश लाहोटी, जिंतूरच्या तहसीलदार श्रीमती शीतल कच्छवे, जिंतूरचे नगराध्यक्ष श्री. प्रताप देशमुख व गट विकास अधिकारी श्री. सुभाष मानकर यांसह विविध मान्यवर प्रमुख उपस्थित होते. या शिबिरादरम्यान जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत 100% अनुदानावर लाभार्थ्यांना वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात येऊन 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'ची सविस्तर माहिती देण्यात आली.

संग्रामपूर (जि. बुलढाणा): सातपुड्याच्या अतिदुर्गम पर्वतरांगामध्ये वसलेल्या व गूगल मॅपवरही नोंद नसलेल्या चालिस्तापरी या पूर्णत: आदिवासी गावात पशुसंवर्धन विभागाच्या पशुधन विकास अधिकारी डॉ. नयना सिंग यांनी लंपी चर्मरोग (LSD) प्रतिबंधक लसीकरण मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. केवळ दोन महिन्यांपूर्वीच विभागात सेवेत रुजू झालेल्या डॉ. नयना सिंग यांनी पावसाळ्यात अत्यंत खडतर व आव्हानात्मक वाट ओलांडून चालिस्तापरी गावात पोहोचत पशुपालकांच्या जनावरांचे लसीकरण केले. रस्ते व दळणवळणाची कोणतीही सोय नसताना, कर्तव्यनिष्ठेने व ध्येयवादाने पोहोचून केलेल्या या कामगिरीचे परिसरातून व पशुसंवर्धन विभागाकडून विशेष कौतुक होत आहे.





महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग व लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, 21 जुलै 2026 रोजी शेतकऱ्यांसाठी एक दिवसीय विशेष कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' तसेच 'पशुपालनातून शेतकऱ्यांना पूरक उत्पन्नाची संधी' व 'शेतकऱ्यांसाठी दुग्ध उत्पादनाची संधी' या प्रमुख विषयांवर या कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियमाची सांगलीत प्रभावी अंमलबजावणी; 59 खाजगी सेवादात्यांना प्रमाणपत्रांचे वाटप

**कवठेमहांकाळ (जि. सांगली) :** महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, 2023 (बोव्हाईन ब्रीडिंग ॲक्ट) अंतर्गत राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी कवठेमहांकाळ येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

प्रभारी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. अक्षता पतंगराव रेणुशे यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यशाळेस पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (पुणे) चे सहआयुक्त डॉ. याहयाखान पठाण, सहाय्यक आयुक्त डॉ. माधव सदगिरे व सांगलीचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अजयनाथ थोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्या कवठेमहांकाळ तालुक्यातील 59 खाजगी कृत्रिम रेतन सेवादाते व सीमेन बँक पुरवठादारांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच, अद्याप नोंदणी न केलेल्या खाजगी सेवा पुरवठादारांनी प्राधिकरणाकडे लवकर नोंदणी करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे







# जळगाव येथे 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' कार्यशाळा संपन्न; मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांचे मार्गदर्शन



**जळगाव:** जिल्हा परिषद जळगावच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. करिष्मा नायर (IAS) यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव जिल्ह्यातील विविध भागांतील पशुपालकांसाठी 'क्लस्टर बेस' (Cluster-based) स्वरूपात 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत स्वतः मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर मॅडम यांनी उपस्थित राहून योजनेतील पशुपालकांचा सहभाग, तिची उपयुक्तता व ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळणारी चालना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तर जळगावचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रदीप झोड यांनी योजनेच्या तांत्रिक व व्यावहारिक बाबींवर पूरक व सखोल माहिती दिली.

या कार्यक्रमाला जळगाव जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. रणधीर सोमवंशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे (DRDA) प्रकल्प संचालक मा. राजू लोखंडे, गार्डियन करेक्ट (नाशिक) संस्थेचे प्रमुख श्री. रवी अमृतकर, डॉ. अनिल शिंदे, डॉ. संतोष शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील आदर्श पशुपालक, आदर्श शेतकरी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




जिंतूर (परभणी) : येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'त विविध योजनांच्या लाभार्थ्यांचा व सेवादात्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या शिबिरादरम्यान पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित कुक्कुटपालन प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यासोबतच, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन अधिनियम अंतर्गत नोंदणी केलेल्या सेवादात्यांनाही मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नवउद्यमींना प्रोत्साहन मिळण्यासोबतच पशुपालनास शास्त्रीय व कायदेशीर अधिष्ठान मिळण्यास मदत होणार असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

# 167 शेळ्यांना जीवदान





**कुपटी :** पशुवैद्यकीय चिकित्सालय कुपटी अंतर्गत येणाऱ्या पवनाळा येथे शेळ्यांना झालेल्या अचानक विषबाधेच्या घटनेत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पवनाळा येथे सकाळी सुमारे 170 शेळ्यांचा खांड नेहमीप्रमाणे जंगलात चरण्यासाठी गेला होता. दरम्यान, अचानक विषारी वनस्पती किंवा दूषित घटक खाण्यात आल्यामुळे विषबाधा होऊन 3 शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पवळे व श्री. राजगुरू यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पशुवैद्यकीय पथकाने वेळेचा विलंब न लावता उर्वरित सर्व शेळ्यांवर प्रत्यक्ष घटनास्थळीच योग्य ते प्रथमोपचार व औषधोपचार सुरू केले.

डॉक्टरांच्या या त्वरित व प्रभावी उपचारांमुळे पुढील अनर्थ टळला असून, त्यानंतर एकही मरतूक झाली नाही. वेळेवर मिळालेल्या वैद्यकीय मदतीमुळे 167 शेळ्यांचे प्राण वाचल्याने पशुपालकांनी सुटकेचा विश्वास सोडत पशुवैद्यकीय पथकाचे आभार मानले आहेत. कोणत्याही पशुवैद्यकीय उपचारासाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक पशुवैद्यकीय मदतीसाठी 1962 या कॉल सेंटर क्रमांकावर तसेच 9063142299 या व्हॉट्स अप चॅटबॉट क्रमांकावर 'hi' असे लिहून संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



**गडहिंग्लज:** तालुका पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) येथे स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात 300 शेतकऱ्यांना 1500 किलो मका बियाण्याचे वाटप करण्यात आले. जिल्हा उपयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रसंगी कोल्हापूर जिल्हा परिषद पशुसंवर्धन समिती सदस्या मा. शैलजा पाटील, मा. सतीश पाटील, पंचायत समिती सदस्य, डॉ. पंकज सोनवणे, डॉ. शिवशंकर चिकोडी, तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी व परिसरातील पशुपालक-शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वेळेत बियाणे उपलब्ध झाल्याबद्दल पशुपालकांनी पशुसंवर्धन विभागाचे आभार मानत, दुग्ध उत्पादकांच्या पाठीशी विभागाने असेच खंबीरपणे उभे राहावे, अशी भावना व्यक्त केली.



## बोथली येथे पशुरोग निदान शिबीर

'प्रती पशुवैद्यकीय दवाखाना आठवड्यातून एक शिबीर' या उपक्रमांतर्गत दि. 22 जुलै रोजी पशुवैद्यकीय चिकित्सालय डोंगरगाव (खजरी), ता. सडक अर्जुनी (जि. गोंदिया) यांच्या वतीने बोथली गावात पशुरोग निदान व उपचार शिबीर पार पडले.

भर पावसातही पशुवैद्यकीय पथकाने पशुपालकांच्या घरोघरी जाऊन गाई-म्हशींची वंध्यत्व व गर्भधारणा तपासणी केली, औषधोपचार केले तसेच गोचीड निर्मूलन इंजेक्शन दिले.

या शिबिरास सडक अर्जुनी तालुका लघुपशुवैद्यकीय चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. गुणवंत भडके, पशुवैद्यकीय अधिकारी (घाटबोरी तेली) डॉ. पंकज वाघाये, पशुधन पर्यवेक्षक (डोंगरगाव खजरी) श्री. बबलू वलथरे, परिचर श्री. जयपाल गोबाडे तसेच खाजगी सेवादाते व पशुसखींचे विशेष सहकार्य लाभले.

# मानवत येथे तीन दिवसीय पशुसंवर्धन प्रशिक्षण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



मानवत, जि. परभणी : पशुसंवर्धन विभाग, मानवत यांच्या वतीने मानवत तालुक्यातील पशुपालकांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरात दुग्ध व्यवसाय व शेळीपालन या विषयांवर तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थित पशुपालकांच्या विविध शंकांचे समाधान करून त्यांना आधुनिक पशुपालनाबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली.

पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहितीही पशुपालकांना देण्यात आली. विशेषतः मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत लाभ, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया, अनुदानाची माहिती, योजनेचा लाभ कसा घ्यावा याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी तालुका पशुसंवर्धन व दुग्ध विकास अधिकारी डॉ. अशोक जायभाये तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल डांगे यांनी आधुनिक पशुपालन पद्धती, दुग्ध व्यवसायातील आर्थिक संधी, वैज्ञानिक शेळीपालन व शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण शिबिरास मानवत तालुक्यातील मोठ्या संख्येने पशुपालकांनी उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घेतला. पशुपालकांनी शासनाच्या योजनांविषयी माहिती मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत अशा प्रकारची प्रशिक्षण शिबिरे नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली व मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेविषयी उत्सुकता दर्शविली.

---

# भदुटोला येथे पशुरोग निदान शिबिर



सौदड, ता. सडकअर्जुनी (जि. गोंदिया): पशुवैद्यकीय चिकित्सालय, सौदड अंतर्गत भदुटोला येथे पशुरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये गायी व म्हशींची गर्भधारणा तपासणी, वंध्यत्व निदान, खच्चीकरण तसेच आवश्यक औषधोपचार करण्यात आले. याशिवाय जनावरांवरील परजीवींचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी गोचीड निर्मूलनासाठी उपचार करण्यात आले.

या शिबिरात डॉ. गुणवंत भडके, सहाय्यक आयुक्त, तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय, सडकअर्जुनी, डॉ. सौरभ कवठे, पशुधन विकास अधिकारी, चिखली, श्री. जयपाल गोबाडे, परिचर, सौदड, तसेच खाजगी सेवादाता व पशुसखी यांनी सक्रिय सहभाग घेत पशुपालकांना मार्गदर्शन केले. पशुधन आरोग्य व्यवस्थापनाबाबत, नियमित लसीकरण, परजीवी नियंत्रण, प्रजनन व्यवस्थापन व वेळेवर उपचार यांचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले.

महापशुधन वार्ता

# प्राणीजन्य आजारांविषयी जनजागृतीचा संदेश : नागपुरात 'जागतिक प्राणीजन्य रोग दिन' साजरा




नागपूर : प्राण्यांपासून मानवामध्ये पसरणाऱ्या प्राणीजन्य (झुनोटिक) आजारांविषयी जनजागृती करण्यासाठी पशू वैद्यकीय सर्वचिकित्सालय, नागपूर येथे 'जागतिक प्राणीजन्य रोग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त नागरिक, प्राणिप्रेमी व पशुपालकांसाठी मार्गदर्शन, आरोग्य तपासणी व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रादेशिक सहआयुक्त डॉ. सतीश राजू, जिल्हा उपआयुक्त डॉ. नितीन फुके, सहायक आयुक्त डॉ. सुबोध नंदागवळी व डॉ. मयूर काटे यांनी रेबीज, बर्ड फ्लू, लेप्टोस्पायरोसिस तसेच प्राण्यांमधून पसरणाऱ्या क्षयरोगासारख्या आजारांची माहिती देत प्रतिबंधात्मक उपायांवर मार्गदर्शन केले. रेबीज हा शंभर टक्के घातक असला तरी वेळेवर लसीकरण केल्यास तो पूर्णपणे टाळता येतो, याकडे त्यांनी विशेष लक्ष वेधले.

यावेळी पाळीव कुत्रे व मांजरींसाठी मोफत आरोग्य तपासणी व डी-वॉर्मिंग मोहीम राबविण्यात आली. 'वन हेल्थ' संकल्पनेचा पुरस्कार करत प्राण्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे म्हणजेच मानवी आरोग्याचे संरक्षण असल्याचा संदेश तज्ज्ञांनी दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विरबॅक कंपनीचे वरिष्ठ अधिकारी दादासाहेब काटकर, सय्यद अझहर अली व सतपाल साई यांनी सहकार्य केले. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा जनजागृती मोहिमा नियमितपणे राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली.

जागतिक प्राणीजन्य रोग दिन : दरवर्षी ६ जुलै रोजी जागतिक प्राणीजन्य रोग दिन साजरा केला जातो. हा दिवस ६ जुलै १८८५ रोजी फ्रेंच शास्त्रज्ञ Louis Pasteur यांनी रेबीजविरुद्धची पहिली यशस्वी लस दिल्याच्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ पाळला जातो. प्राणी व माणूस यांच्यामध्ये नैसर्गिकरित्या प्रसारित होणाऱ्या संसर्गजन्य रोगांना प्राणीजन्य (Zoonotic) रोग म्हणतात. हे रोग विषाणू, जीवाणू, परजीवी किंवा बुरशीमुळे होऊ शकतात. जगातील सुमारे ६०% संसर्गजन्य रोग प्राणीजन्य उगमाचे आहेत. नव्याने उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगांपैकी सुमारे ७५% रोग प्राणीजन्य असतात.

# एफएमडी (लाळखुरकत रोग) नेटवर्क प्रयोगशाळांची 33 वी वार्षिक पुनरावलोकन बैठक

नवी दिल्ली: येथील राष्ट्रीय कृषी विज्ञान केंद्र (NASC) येथे दि. 5 व 6 ऑगस्ट 2026 दरम्यान एफएमडी (लाळखुरकत रोग) नेटवर्क प्रयोगशाळांची 33 वी वार्षिक पुनरावलोकन बैठक पार पडली. ICAR चे उपमहासंचालक (DDG) व NIFMD भुवनेश्वरच्या संचालकांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत लाळखुरकत निर्मूलन व तांत्रिक धोरणांवर सविस्तर चर्चा झाली.

**बैठकीतील प्रमुख तांत्रिक मुद्दे व धोरणात्मक निर्णय:**

1. 'FMD-SAT 1' प्रादुर्भाव पूर्वतयारी: सध्याच्या NADCP कार्यक्रमात 'O', 'A' व 'Asia 1' साठीच लस दिली जात असल्याने भारतीय पशुधनात 'SAT 1' या नवीन स्ट्रेनविरुद्ध प्रतिकारशक्ती नाही. यासाठी आपत्कालीन लस साठा तयार करणे, नवीन लस विकास व आंतरराष्ट्रीय सीमांवर कडक देखरेख ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.
2. सेंटिनल सर्व्हेलन्स: रोगाची आगाऊ माहिती मिळण्यासाठी धोकादायक क्षेत्रांत 'सेंटिनल हर्ड्स' तैनात केले जातील व हा डेटा 'भारत पशुधन पोर्टल'शी रिअल-टाइम रिपोर्टिंगसाठी जोडला जाईल.
3. प्रोबँग टेस्टिंग: कॅरिअर (वाहक) प्राण्यांची ओळख पटवण्यासाठी घशातील लाळेचे सॅम्पलिंग केले जाईल. देशातील 33 केंद्रांमध्ये चाचणीचे मानकीकरण लागू केले जाईल.
4. सेरो-मॉनिटरिंग: लसीकरणानंतरच्या अँटीबॉडीजचे मूल्यमापन व 'DIVA' चाचणीद्वारे (NSP चाचणी) संक्रमित व लसीकरण केलेल्या जनावरांमधील फरक ओळखला जाईल.

### महाराष्ट्राचे सादरीकरण व महत्त्वपूर्ण बाबी:

महाराष्ट्रासह 5 राज्यांचे नेतृत्व करणाऱ्या विभागीय केंद्र पुण्याचे सादरीकरण सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. नाना सोनावणे यांनी केले. यावेळी त्यांनी,

- लाळखुरकत निर्मूलनात लसीची शीत साखळी व तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण लसीकरण हे दोन घटक अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले.
- विषाणूचे सर्क्युलेशन रोखण्यासाठी भविष्यात दक्षिण भारतातील सर्व राज्यांमध्ये एकाचवेळी लसीकरण मोहीम राबवली जाईल.
- SAT 1, 2, 3 तसेच O, A, C व Asia 1 या सिरोटाईप्सच्या प्रादुर्भावाचे वेळेवर निदान करण्यासाठी रोगाच्या वेळी योग्य नमुने पाठवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

केन्द्रीय पातळीवर पाठपुरावा केलेले इतर मुद्दे (आयुक्त यांच्या निर्देशानुसार): या दौऱ्यात ASCAD योजनेअंतर्गत बर्ड फ्लू नुकसानभरपाई, LSD च्या एक वर्षाच्या आतील NDLM नोंदी, नाशिक येथील बदकांच्या मृत्यूची पुनरावलोकन चर्चा, WRDDL निधी पाठपुरावा, पशु औषधी केंद्र पोर्टलसमस्या व औंध (पुणे) येथील BSL-III प्रयोगशाळेचे 'थर्ड पार्टी ऑडीट' या विषयांवर केंद्र शासनाकडे यशस्वी पाठपुरावा करण्यात आला.







# झुनोटिक रोग (Zoonotic Diseases)

ONE HEALTH
मानव - प्राणी - पर्यावरण

महापशुधन वार्ता

## प्राणी पासून मानवामध्ये होणारे रोग

झुनोटिक रोग म्हणजे असे संसर्गजन्य रोग की जे नैसर्गिकरित्या प्राणी आणि मानव यांच्यामध्ये एकमेकांमध्ये पसरतात. हे रोग जिवाणू, विषाणू, परजीवी, बुरशी किंवा प्रायॉन यांमुळे होऊ शकतात.

## झुनोटिक रोगांचे वर्गीकरण (वहनाच्या पद्धतीनुसार)

### 1. थेट झूनोसिस (Direct Zoonoses)

संसर्गित प्राण्यांशी थेट संपर्क, चावा घेतल्याने, ओरखडा, शिंका/खोकल्याच्या थेंबांद्वारे किंवा शरीरातील द्रवांच्या संपर्कातून मानवात पसरतात.



उदाहरणे
- रेबीज (Rabies)
- ब्रुसेलोसिस (Brucellosis)
- लेप्टोस्पायरोसिस (Leptospirosis)

### 2. सायकलोझूनोसिस (Cyclozoonoses)

यांच्या जीवनचक्रासाठी दोन किंवा अधिक कशेरुकी यजमान (vertebrate hosts) आवश्यक असतात.



उदाहरणे
- टिनायसिस (Taeniasis)
- हायडेटिड रोग (Hydatid disease)

### 3. मेटाझूनोसिस (Metazoonoses)

यांच्या जीवनचक्रासाठी कशेरुकी यजमानासोबत अकेरुकी वाहक (invertebrate vector) आवश्यक असतो.



उदाहरणे
- प्लेग (Plague) – उवा (flea) द्वारे
- लाइम रोग (Lyme disease) – किलटिक द्वारे
- जपानी एन्सेफेलायटिस (Japanese encephalitis) – डास द्वारे

### 4. सॅप्रोजूनोसिस (Saprozoonoses)

यांच्या जीवनचक्रात प्राणी यजमानांबरोबर पर्यावरणातील निर्जीव घटक (माती, पाणी, वनस्पती इ.) टप्पा आवश्यक असतो.



उदाहरणे
- टोक्सोकॅरायसिस (Toxocariasis)
- हिस्टोप्लाझमोसिस (Histoplasmosis)

## कारक घटकांनुसार वर्गीकरण

### विषाणूजन्य रोग (Viral)



- रेबीज (Rabies)
- एवियन इन्फ्लूएंझा (Avian Influenza)
- जपानी एन्सेफेलायटिस (Japanese Encephalitis)

### जिवाणूजन्य रोग (Bacterial)



- ब्रुसेलोसिस (Brucellosis)
- लेप्टोस्पायरोसिस (Leptospirosis)
- क्षयरोग (Tuberculosis)
- अँथ्रॅक्स (Anthrax)
- प्लेग (Plague)

### परजीवीजन्य रोग (Parasitic)



- टिनायसिस (Taeniasis)
- हायडेटिड रोग (Hydatid disease)
- टोक्सोप्लाझमोसिस (Toxoplasmosis)
- मलेरिया (Malaria)

### बुरशीजन्य रोग (Fungal)



- रिंगवर्म (Dermatophytosis)
- हिस्टोप्लाझमोसिस (Histoplasmosis)

### प्रायॉनजन्य रोग (Prion)



- वेरियंट क्रुट्झफेल्ट-जेकब रोग (vCJD)

## प्रतिबंधात्मक उपाय

- ✓ प्राण्यांचे लसीकरण करा (उदा. रेबीजसाठी).
- ✓ व्यक्तिगत स्वच्छता व हात स्वच्छ धुण्याची सवय ठेवा.
- ✓ मांस व दूध व्यवस्थित शिजवून खा, कच्चे दूध टाळा.
- ✓ कीटक वाहकांचे नियंत्रण करा (डास, किल, उवा).
- ✓ प्राणी हाताळताना हातमोजे/मास्क इ. वापरा.
- ✓ प्राण्यांचे मलमूत्र योग्य प्रकारे नष्ट करा.
- ✓ शेती व पशुपालनात स्वच्छता आणि जैवसुरक्षा पाळा.



## सामान्य झुनोटिक रोगांची उदाहरणे

| रोग | प्राणी स्रोत | कारक घटक |
|---|---|---|
| रेबीज (Rabies) | कुत्री, वटवाघूळ | विषाणू |
| ब्रुसेलोसिस (Brucellosis) | गायी, शेळी, मेंढी | जिवाणू |
| लेप्टोस्पायरोसिस (Leptospirosis) | उंदीर, गायी, कुत्री | जिवाणू |
| अँथ्रॅक्स (Anthrax) | शाकाहारी प्राणी | जिवाणू |
| टोक्सोप्लाझमोसिस (Toxoplasmosis) | मांजर | परजीवी |
| हायडेटिड रोग (Hydatid disease) | कुत्री | परजीवी |

**लक्षात ठेवा : निरोगी प्राणी - सुरक्षित मानव - स्वच्छ पर्यावरण = निरोगी समाज**


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य



मखमली हिरव्या माळरानी
तृण भक्षिता तृप्त होऊनी
प्रसन्न मुद्रा सुख लोचनी
आनंद दर्शने महिष त्रिवेणी!

-संतोष पवार, महापशुधनवार्ता

# दुग्ध व्यवसायात तरुणांना मोठी संधी : डॉ. भिकाणे

लोकमंगल पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्यावतीने चर्चासत्र



वडवळी दूध उत्पादकांचा सन्मान

नवराष्ट्र
Gadchiroli | 25 July 2026 | Page 1

# ५.६० लाख पशुधनाचे लसीकरण

पशुसंवर्धन विभागाची मोहीम; घटसर्प, एकटांग्या, आंत्रविकारावर उपचार

नवराष्ट्र FOCUS



तालुकानिहाय जनावरांची संख्या



उपलब्ध साठा व केलेले रोग लसीकरण

पुण्यनगरी

# नाडे पूर्व येथे पशुपालकांसाठी मार्गदर्शन शिबिर

जनावरांच्या आरोग्याबाबत जनजागृती

मल्हारपेठ/प्रतिनिधी

पाटण तालुक्यातील मौजे नाडे पूर्व येथे शनिवारी सकाळी ११ वाजता मल्हारपेठ पशुवैद्यकीय चिकित्सालय आणि ग्रामपंचायत नाडे यांच्या संयुक्त विद्यमाने जनावरांच्या आरोग्य संवर्धनासाठी विशेष पशुवैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. पशुराम मंदिर सभामंडपात झालेल्या या शिबिराला परिसरातील पशुपालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बेलवडे नाडे येथे गेल्या चार ... पंचायत समितीचे उपसभापती ... पवार (नाना) यांच्या प्रमुख ...थतीत पाटण पंचायत समितीचे ...द्यकीय अधिकारी. चव्हाण यांच्या ...र्शनाखाली पशुपालकांसाठी विशेष ...र्शन सत्र घेण्यात आले. पशुधनाचे ...य, संतुलित आहार, रोगप्रतिबंधक ...योजना आणि वेळेवर उपचार याबाबत (एचएस) आजारावरील प्रतिबंधात्मक लसीकरणाचे महत्त्व, लाळखुरकत त्यासाठी काळजी तसेच पावसाळ्यात जनावरांचे आरोग्य कसे जपावे, याबाबत सविस्तर जनजागृती करण्यात आली. यावेळी तज्ज्ञांनी सविस्तर माहिती दिली.

मार्गदर्शन करताना उपसभापती विजय पवार (नाना) तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश पवार यांनी पशुपालकांना भविष्यातही मल्हारपेठ पशुवैद्यकीय चिकित्सालयामार्फत आवश्यक ते सर्व सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाही दिली. यावेळी नाडेचे उपसरपंच राजेंद्र पवार, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सागर डोलताडे, डॉ. सुचिता माळी, डॉ. प्रदीप पवार, पशुवैद्यकीय विभागाचे कर्मचारी, ग्रामस्थ तसेच पशुपालक उपस्थित होते.



नाडे पूर्व येथे पशुपालकांसाठी मार्गदर्शन शिबिर प्रसंगी उपसभापती विजय पवार पशुवैद्यकीय अधिकारी व शेतकरी वर्ग.

# मोफत चारा व बियाणे वाटप



लोकमत

# अनुदानावर गाई-म्हशी आपल्या दारी; शुद्ध दुधाला चांगला भाव मिळणार

ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना : दूध व्यवसायासाठी अनुदान मि...

पशुधन उद्योजकता योजनेंतर्गत दूध व्यवसायासाठी मिळणार अनुदान





नमो महाराष्ट्र

पशुवैद्यकीय चिकित्सालयात अत्याधुनिक पशुसोनोग्राफी मशीनचे लोकार्पण

...ळाच्या खुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम १३ ऑगस्टपासून

# राज्यभरात १३ ऑगस्टपासून लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण

पशुधनाचे १०० टक्के लसीकरण करा : पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील

पुढारी



# State Animal Husbandry Commr visits Chandrapur



# नवतंत्रज्ञानातून दुग्ध उत्पादनात वाढ

# यशस्वी कृत्रिम रेतनात भंडारा राज्यात अव्वल



# जनावरांची ऑनलाईन नोंदणी बंधनकारक

जिल्हा उपायुक्त डॉ. अनिल तांबे : खाजगी सेवादात्यांचे शिबीर संपन्न



तरुण भारत AGRI बिझनेस



# अल निनोचा प्रभाव, चारा टंचाई समस्या

लोकमत

# देसाईगंज तालुक्यात १०० टक्के अनुदानावर वैरण बियाण्यांचे वाटप

बातमी जगत

प्राणीजन्य आजारांविषयी जनजागृतीचा संदेश : नागपुरात 'जागतिक प्राणीजन्य रोग दिन' साजरा



पुण्यनगरी

# मुख्यमंत्री पशुधन योजनेत जिल्हा राज्यात अव्वल आणा



देशोन्नती

# पशुवंध्यत्व तपासणी, लम्पी लसीकरण शिबीर



जिल्हा पशुसंवर्धन विभागाने केला पुढाकार; १३ तालुक्यांची लसीकरण ९८ टक्के

# ह्यात १.४४ लाख गोवंशांना लम्पी लस



लोकबंध लिहर

# महात्मा जोतीराव फुले द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन



रुद्रसागर

# शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

पशुधनाची तपासणी ■ लम्पी प्रतिबंधक लसीकरण व औषधोपचार



पुण्यनगरी

# जतकरांनो, जतची ओळख पशुधन हब म्हणून घडवा : अजितराव घोरपडे

स्व. अजितदादांच्या जयंतीनिमित्त १७ टन मोफत वैरण बियाण्यांचे वाटप



# पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे

## लसीकरणातून पशुरोग मुक्त महाराष्ट्राकडे वाटचाल...








**डॉ. याहयाखान पठाण**
सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे
मोबा. 9423324609

**डॉ. सुनिता चौगुले**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-411067

**डॉ. ऋषीकेश काळे**
पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-411067


भारताच्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत पशुसंवर्धन हा ग्रामीण उपजीविकेचा आधारस्तंभ आहे. मात्र पशुधानातील लाळ्या-खुरकुत (FMD), लम्पी चर्मरोग (LSD), ब्रुसेलोसिस (Brucellosis), पीपीआर (PPR), घटसर्प (Haemorrhagic Septicemia), फऱ्या (Black Quarter), आंत्रविषार (Enterotoxaemia) यांसारख्या संसर्गजन्य रोगांमुळे पशुपालकांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागते. जागतिकीकरण, वाढता पशुव्यापार, हवामानातील बदल व नव्याने उद्‌भवणारे संसर्गजन्य रोग यांच्या पार्श्वभूमीवर पशुरोग नियंत्रणाचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

पशुरोग नियंत्रणासाठी "प्रतिबंधात्मक उपाययोजना" हा सर्वात प्रभावी व किफायतशीर मार्ग मानला जातो. यामध्ये त्वरित प्रतिसाद व्यवस्था (Rapid Response Team-RRT), रोगनिदान (Disease Diagnosis), संनिरीक्षण (Surveillance), जैवसुरक्षा (Biosecurity) इ. घटकांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. तथापि, या सर्व उपाययोजनांचा पाया म्हणजे उच्च दर्जाच्या, सुरक्षित, प्रभावी व वैज्ञानिकदृष्ट्या प्रमाणित जैविक पदार्थांची व लसमात्रा (Vaccine) यांची उपलब्धता होय.

महाराष्ट्र राज्यामध्ये पशुधनासाठी रोगप्रतिबंधक लसमात्रांचे उत्पादन करणारी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे ही एकमेव शासकीय संस्था आहे. येथे जिवाणूजन्य रोगांवरील घटसर्प, फऱ्या, आंत्रविषार तसेच पीपीआर, मेंढी-शेळी देवी, कुक्कुट रोग (लासोटा, मरेक्स) या विषाणूजन्य रोगांवरील लसमात्रा तयार होतात. याशिवाय रोग निदानासाठी प्रतिजन (Salmonella Coloured Antigen) व स्तनदाह निदानाकरीता (CMT Reagent) अभिकारकेही उत्पादित केली जातात. संस्थेंतर्गत निर्माण केलेल्या लसमात्रा राज्यातील शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये नाममात्र सेवा शुल्क आकारून उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे लसीकरण कार्यक्रमांना बळ मिळून रोगप्रसार कमी होऊन पशुधनाचे आरोग्य व दूध उत्पादन सुधारते व पर्यायाने पशुपालन व्यवसाय किफायतशीर होण्यास मदत होते.

लम्पी चर्मरोग (LSD) हा अलीकडील काळात गोवंशीय पशुधनासाठी एक गंभीर आव्हान ठरलेला रोग आहे. या रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी स्वदेशी लस निर्मितीची आवश्यकता लक्षात घेऊन पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे संस्थेमध्ये आवश्यक तांत्रिक, वैज्ञानिक व उत्पादनविषयक बाबींचा अभ्यास करून लस निर्मिती प्रक्रियेला गती देण्याचे कार्य सुरू आहे. लम्पी रोगावरील प्रभावी लस उपलब्ध झाल्यानंतर राज्यातील लसीकरण कार्यक्रम अधिक सक्षम होण्यास मदत होईल. तसेच, रोगाचा प्रसार रोखणे, पशुधनाचे आरोग्य जपणे व पशुपालकांचे आर्थिक नुकसान कमी करणे या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पशुरोग नियंत्रणासाठी आधुनिक व स्वदेशी उपाययोजना विकसित करण्याच्या दिशेने संस्थेचे हे एक महत्त्वाकांक्षी पाऊल मानले जात आहे.

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे येथे विविध जिवाणूजन्य व विषाणूजन्य रोगप्रतिबंधक लसमात्रांच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनामध्ये मागील काही वर्षांत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.







मागील 5 वर्षांमध्ये विविध लसमात्रांचे प्रती वर्ष उत्पादन उत्तरोत्तर वाढत असून सद्यस्थितीत एकूण लसमात्रा उत्पादन, घटसर्प (HSV) 80.93 लाख, फऱ्या (BQV) 37.26 लाख, आंत्रविषार (ETV) 90.27 लाख, राणीखेत-मुक्तेश्वर (RDMV) 150 लाख, राणीखेत-लासोटा (RD-LV) 26.31 लाख, कोंबड्यांची देवी (FPV) 53.41 लाख, मेंढ्यांची देवी (SPV) 19.61 लाख इतके वाढले असून, राज्यातील पशुधनाच्या मान्सून पूर्व लसीकरण कार्यक्रमांना क्षेत्रीय स्तरावर आवश्यक प्रमाणात लस मात्रा पुरवठा करणे शक्य झाले आहे.

मागील 5 वर्षांपासून पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे अंतर्गत निर्मित विविध लसमात्रांचे शासकीय पशुचिकित्सालयांद्वारे केलेल्या लसीकरणामुळे क्षेत्रीय स्तरावर पशुधनातील विविध साथरोगांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत. सदर बाब खालील आलेखांच्या आधारे अधोरेखित होते.

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे अंतर्गत मागील 5 वर्षांची लस मात्रा निर्मिती

क्षेत्रीय स्तरावरील पशुधानातील मागील 5 वर्षांमधील साथ रोग नियंत्रण

## घटसर्प (Haemorrhagic Septicaemia-HS)







## फऱ्या (Black Quarter-BQ)






# आंत्रविषार (Enterotoxaemia-ET)







क्षेत्रीय स्तरावरील लसमात्रांच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर उत्पादन क्षमता, गुणवत्ता नियंत्रण व वितरण व्यवस्थेमध्ये केलेल्या सुधारणांमुळे राज्यातील पशुधन आरोग्य सुरक्षेला अधिक बळकटी मिळाली आहे. रोगप्रतिबंधक लसींच्या उपलब्धतेमुळे पशुधानातील साथरोगाचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली असून पशुपालकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होत आहे.

60 वर्षांहून अधिक परंपरा असलेल्या पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), पुणे ने पशुधानातील लस निर्मिती मध्ये गुणवत्ता नियंत्रण, जैवसुरक्षा, रोगनिदान व संशोधन यामध्ये सातत्याने प्रगती केली असून पशुपालकांचा दुग्ध व कुक्कुट निगडीत व्यवसाय करताना विश्वास वाढला आहे. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेशी सुसंगत अशी स्वदेशी उत्पादन क्षमता विकसित करून ही संस्था राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांना वैज्ञानिक पाठबळ देत आहे.









## गोवर्गीय व महिषवर्गीय पशुधन (गाई व म्हशी) लसीकरण वेळापत्रक

| अ. क्र. | रोग | प्राथमिक लसीकरण | दुबार लसीकरण | वार्षिक लसीकरण |
|---|---|---|---|---|
| 1 | लाळ-खुरकूत (Foot and Mouth Disease) | वयाच्या चौथ्या महिन्यात | पहिल्या मात्रेनंतर 1 महिन्यांनी | वर्षातून दोन वेळा मार्च व सप्टेंबर महिन्यात |
| 2 | घटसर्प (Haemorrhagic Septicemia) | वयाच्या सहाव्या महिन्यात | --- | एप्रिल / मे महिन्यात |
| 3 | फऱ्या (Black Quarter) | वयाच्या सहाव्या महिन्यात | --- | एप्रिल / मे महिन्यात |
| 4 | लंपी (LSD) | वयाच्या चौथ्या महिन्यात | | एप्रिल / मे महिन्यात |
| 5 | थायलेरियासिस (Theileriosis) | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | -- | मे महिन्यात, प्राधान्याने संकरीत गोवर्गीय पशुधनामध्ये, दर 3 वर्षांनी |
| 6 | अँथ्रॅक्स (Anthrax) | वयाच्या सहाव्या महिन्यात केवळ रोग वारंवार उद्‌भवणाऱ्या भागात | -- | ऑगस्ट महिन्यात केवळ रोग वारंवार उद्‌भवणाऱ्या भागात वर्षातून एक वेळा याप्रमाणे पुढील सलग 3 वर्षे |
| 7 | संसर्गजन्य गर्भपात (Brucellosis) | केवळ 4 ते 8 महिने वयाच्या कालवडी / पारड्यांमध्ये एकदाच | -- | -- |
| 8 | रेबीज (Rabies) | कुत्रे, मांजर, लांडगा, इत्यादी चावल्यानंतर त्वरित | चावल्यानंतर त्याच दिवशी व तद्‌नंतर 3 ऱ्या, 7 व्या, 14 व्या , 28 व्या व 90 व्या दिवशी | चावा घेणारा प्राणी रेबीज बाधित असल्यास 6 मात्रा घ्याव्या अन्यथा किमान 3 मात्रा |

## वराहामधील लसीकरणाचे वेळापत्रक

| अ. क्र. | रोगाचे नाव | पहिली मात्रा | दुसरी मात्रा | तिसरी मात्रा | वार्षिक लसीकरण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लाळ खुरकूत (Foot and Mouth Disease) | वयाच्या 3 आठवड्यात | पहिल्या मात्रेपासून 30 ते 45 दिवसात | पहिल्या मात्रेपासून 6 महिन्यात | मार्च व सप्टेंबर महिन्यात |
| 2 | क्लासिकल स्वाईन फीवर | 45 दिवसांच्या पिल्लांमध्ये | पहिल्या मात्रेपासून 1 महिन्यात | पहिल्या मात्रेपासून 6 महिन्यात | एप्रिल व ऑक्टोबर महिन्यात |

## अश्ववर्गीय प्राण्यांमधील लसीकरणाचे वेळापत्रक

| अ. क्र. | रोगाचे नाव | प्राथमिक लसीकरण | दुबार लसीकरण | वार्षिक लसीकरण |
|---|---|---|---|---|
| 1 | धनुर्वात (Tetanus) | वयाच्या 5 व्या महिन्यात | प्राथमिक लसीकरणाच्या 28 दिवसात | ऑक्टोबर महिन्यात |
| 2 | इक्वाईन राह्यनो न्यूमोनायटिस | वयाच्या नवव्या महिन्यात | प्राथमिक लसीकरणाच्या 21-28 दिवसात | गाभण अश्ववर्गीय प्राण्यांच्या गर्भावस्थेच्या 5 व्या, 7 व्या व 9 व्या महिन्यामध्ये |
| 3 | इक्वाईन एनफ्लूएंझा | वयाच्या सहाव्या महिन्यात | प्राथमिक लसीकरणाच्या 30 दिवसात, त्यानंतर 3 री मात्रा 30 दिवसात | शर्यतीच्या घोड्यांमध्ये स्थलांतर करण्यापूर्वी |
| 4 | रेबीज | वयाच्या 5 व्या महिन्यात | प्राथमिक लसीकरणाच्या 21 ते 28 दिवसात | दर वर्षी दुबार लसीकरणांनंतर एक वर्षात |

**स्त्रोत:** शासन निर्णय, पदुम, दि. 27 फेब्रुवारी 2024

# कुक्कुट पक्ष्यांमधील लसीकरणाचे वेळापत्रक

## व्यावसायिक मांसल पक्षी

| अ. क्र. | वय | लस |
|---|---|---|
| 1 | एक दिवसीय पिल्ले | मरेक्स लस (अंडी उबवणी केंद्रात) |
| 2 | 5 – 7 दिवस | मानमोडी रोगाकरीता लासोटा लस |
| 3 | 14 – 15 दिवस | इन्फेक्शीयस बर्सल डिसीज (गंबोरो) करीता इंटरमीडिएट लस |
| 4 | 21 – 28 दिवस | मानमोडी रोगाकरीता लासोटा दुबार लस |

## परसातील कुक्कुटपालनासाठीच्या कुक्कुट पक्ष्यांचे लसीकरण

| अ. क्र. | लसीचे नाव | प्राथमिक लसीकरण | दुबार लसीकरण (बूस्टर) | वार्षिक लसीकरण |
|---|---|---|---|---|
| 1 | मरेक्स लस | 1 दिवसीय पिल्ले (हॅचरीमध्ये) | -- | -- |
| 2 | लासोटा लस | 1 ला आठवडा | 4 ते 5 आठवड्यांनी | -- |
| 3 | आरटुवी लस | 8 वा आठवडा | 18 वा आठवडा | एप्रिल / मे |
| 4 | इन्फेक्शीयस बर्सल डिसीज (गंबोरो) करीता लस | 2 ते 3 आठवड्यांनी | 18 ते 20 आठवड्यांनी | -- |
| 5 | इन्फेक्शीयस ब्राँकायटिस करीता लस | 4 था आठवडा | 14 वा आठवडा | -- |
| 6 | कोंबड्यांची देवी | 6 वा आठवडा | 14 ते 16 आठवड्यांनी | |

## व्यावसायिक अंडी उत्पादक पक्षी

| अ. क्र. | वय | लस |
|---|---|---|
| 1 | एक दिवसीय पिल्ले | मरेक्स लस (अंडी उबवणी केंद्रात) |
| 2 | 5 ते 7 दिवस | मानमोडी रोगाकरीता लासोटा लस |
| 3 | 14 ते 15 दिवस | इन्फेक्शीयस बर्सल डिसीज (गंबोरो) करीता इंटरमीडिएट लस |
| 4 | 21 ते 22 दिवस | मानमोडी रोगाकरीता लासोटा दुबार लस |
| 5 | 28 दिवस | इन्फेक्शीयस ब्राँकायटिस रोगाकरीता लस |
| 6 | 35 दिवस | इन्फेक्शीयस बर्सल डिसीज (गंबोरो) करीता लस |
| 7 | 42 दिवस | कोंबड्यांची देवी |
| 8 | 56 दिवस | मानमोडी रोगाकरीता आरटुवी लस |
| 9 | 98 दिवस | इन्फेक्शीयस ब्राँकायटिस रोगाकरीता लस |
| 10 | 112 दिवस | मानमोडी रोगाकरीता Killed लस |
| 11 | 112 ते 126 दिवस | कोंबड्यांची देवी |

**स्त्रोत:** शासन निर्णय, पदुम, दि. 27 फेब्रुवारी 2024

## शेळ्या-मेंढ्यांमधील लसीकरणाचे वेळापत्रक

| अ.क्र. | रोग | प्राथमिक लसीकरण | वार्षिक लसीकरण |
|---|---|---|---|
| 1 | लाळ खुरकूत | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | वर्षातून 2 वेळा (मार्च व सप्टेंबर) |
| 2 | घटसर्प | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | एप्रिल महिन्यात |
| 3 | आंत्रविषार (Enterotoxaemia) | मादी शेळी / मेंढीस गर्भावस्थेत असताना लसीकरण केलेले असेल तर करडाच्या वयाच्या चौथ्या महिन्यात अन्यथा 8 व्या आठवड्यात लसीकरणाच्या पहिल्या मात्रेनंतर 15 ते 21 दिवसांनी दुबार मात्रा | मे महिन्यात पहिली मात्रा व पहिल्या मात्रेनंतर 15 ते 21 दिवसांनी दुबार मात्रा |
| 4 | पीपीआर (PPR Peste des Petits) | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | मे / जून मध्ये, तदनंतर दर 3 वर्षांनी अथवा केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार |
| 5 | निल जिव्हा (Blue Tongue) | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | जुलै महिन्यात, मेंढ्यांमध्ये रोग वारंवार उद्भवणाऱ्या भागात वर्षातून एक वेळा |
| 6 | अँथ्रॅक्स (Anthrax) | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | ऑगस्ट महिन्यात, रोग वारंवार उद्भवणाऱ्या भागात वर्षातून एक वेळा याप्रमाणे रोग प्रादुर्भावापासून पुढील सलग 3 वर्षे |
| 7 | धनुर्वात (Tetanus) | वयाच्या तिसऱ्या महिन्यात, गर्भावस्थ्यातील मादीस | ऑक्टोबर महिन्यात |
| 8 | मेंढ्यांची देवी (Sheep Pox) | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | डिसेंबर महिन्यात, मेंढ्यांमध्ये रोग वारंवार उद्भवणाऱ्या भागात वर्षातून एक वेळा |
| 9 | शेळ्यांची देवी (Goat Pox) | वयाच्या तिसऱ्या महिन्यात | डिसेंबर महिन्यात, शेळ्यांमध्ये रोग वारंवार उद्भवणाऱ्या भागात वर्षातून एक वेळा |



**1962: मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना अंतर्गत महापशुधन संजीवनी सेवा**



**लंपी लस तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य. लस उत्पादनात स्वयंपुर्णता व इतर राज्यासही लस पुरवठा करण्याची सिध्दता**




**जैव सुरक्षा स्तर 2 व 3 च्या दृष्टीने देशपातळीवरील पश्चिम विभागीय प्रयोगशाळेचे बळकटीकरण**




**स्त्रोत:** शासन निर्णय, पदुम, दि. 27 फेब्रुवारी 2024



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




'पांढरं सोनं' निर्माण करण्याची ताकद व नव्या पर्वाची सुरुवात

शेतकरी मित्रांनो, पशुपालन व दुग्धव्यवसाय हा खऱ्या अर्थाने 'पांढरं सोनं' निर्माण करणारा व्यवसाय आहे. आज जगात अशी कोणतीही फॅक्टरी नाही, जी चारा व पाण्याचे रूपांतर एका परिपूर्ण व अमृततुल्य अन्नामध्ये (दुधामध्ये) करू शकते; ही ताकद फक्त आपल्या गोठ्यातील जनावरांमध्ये आहे. पहाटे चार वाजता उठून गोठ्यात जाणे, ऊन-पावसाची पर्वा न करता जनावरांची सेवा करणे, यात आपल्या पशुपालकांच्या कष्टाला जगात खरोखरच कोणतीही तोड नाही. तुमची ही अपार मेहनत व जिद्द हीच या व्यवसायाची सर्वात मोठी ताकद आहे.

पण, विचार करा, जर या अपार कष्टांना एका 'व्यावसायिक दृष्टिकोनाची' व अचूक नियोजनाची जोड मिळाली, तर हाच गोठा तुम्हाला किती प्रचंड आर्थिक समृद्धी देऊ शकेल?

अनेकदा आपण पाहतो की, लाखो रुपयांची गुंतवणूक करूनही हवा तसा नफा उरत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आपण गोठ्यात एक 'मजूर' किंवा 'कामगार' म्हणून स्वतःला राबवून घेतो, पण त्या गोठ्याचा 'मालक' किंवा अधिक स्पष्ट भाषेत सांगायचे तर 'मुख्य कार्यकारी अधिकारी' (CEO) म्हणून विचार करत नाही. पशुपालन हा आता केवळ परसातील 'जोडधंदा' राहिलेला नाही, तर तो लाखो रुपयांची उलाढाल असणारा एक पूर्णवेळ 'उद्योग' आहे. या उद्योगातून खऱ्या अर्थाने श्रीमंत व्हायचे असेल, तर आपल्याला 'पशुपालक ते उद्योजक' हा मानसिकतेतील प्रवास करावाच लागेल. आज आपण याच 'CEO' मानसिकतेची सविस्तर पायाभरणी करणार आहोत.



डॉ. रोहित धुमाळ
सहाय्यक आयुक्त
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
तालुका पशुवैद्यकीय दवाखाना,
धर्माबाद, जि. नांदेड




### सामान्य शेतकरी विरुद्ध स्मार्ट 'CEO':
### मानसिकतेतील नेमका फरक काय?

जोपर्यंत आपण आपली विचार करण्याची पद्धत बदलत नाही, तोपर्यंत आपला ताळेबंद नफ्यात येणार नाही. एका स्मार्ट डेअरी उद्योजकाच्या विचार करण्याच्या पद्धतीत खालील मोठे बदल असतात:

- **'उत्पादन खर्च' कमी करणे:** डेअरीचा CEO सामान्य शेतकऱ्यापेक्षा वेगळी व्यवसाय पद्धती अंगिकारतो. तो विचार करतो की, "बाजारातील भाव माझ्या हातात नाहीत, पण माझा उत्पादन खर्च माझ्या हातात आहे. माझा 70% खर्च खाद्यावर होतो, तो मी 'मुरघास' व 'टीएमआर' (TMR) तंत्रज्ञान वापरून कमी कसा करू शकेन?"
- **व्यवसायात काम करणे (Working IN the business) विरुद्ध व्यवसायावर काम करणे (Working ON the business):** सामान्य पशुपालक स्वतः दिवसभर शेण काढण्यात व धारा काढण्यात व्यस्त राहतो. पण एक CEO या कामांसाठी मजूर नेमतो व आपला वेळ दुधाचे मार्केटिंग, चाऱ्याचे नियोजन व गोठ्यातील आकडेवारीचे विश्लेषण (Data Analysis) करण्यासाठी वापरतो.
- **भावनिक निर्णय विरुद्ध डेटावर आधारित कठोर निर्णय:** एखादी गाय अनेक महिने उलटूनही गाभण राहत नसेल, तर सामान्य शेतकरी "घरची गाय आहे, कधीतरी राहील गाभण" या आशेवर भावनिक होऊन तिला केवळ विनाकारण पोसत राहतो. पण, एका स्मार्ट CEO साठी गोठ्यातील प्रत्येक जनावर हे एक 'प्रॉफिट सेंटर' असते. जर एखादे जनावर व्यवसायाला आर्थिक तोटा देत असेल, तर तो केवळ आशेवर अवलंबून न राहता 'डेटाचा' वापर करतो. गाय गाभण न राहण्यामागे आहाराची कमतरता आहे, हार्मोनल अडचण आहे की आजारपण, याचे तो अचूक 'ऑडिट' करतो. तो तातडीने पशुवैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेऊन तिच्यावर एका निश्चित वेळेत 'टार्गेटेड ट्रीटमेंट' सुरू करतो. जनावराला वाऱ्यावर न सोडता किंवा केवळ पोसत न बसता, अचूक वैद्यकीय व व्यवस्थापकीय उपाययोजना करून तिला पुन्हा नफा देणारी 'ॲसेट' बनवण्याचा तो स्मार्ट व्यावसायिक निर्णय घेतो.

**गोठा हे तुमचे 'कॉर्पोरेट ऑफिस' आहे, त्याचे 'ऑडिट' करा!**

तुम्ही एखाद्या मोठ्या कॉर्पोरेट कंपनीच्या CEO ला पाहिले आहे का? तो हवेत निर्णय घेत नाही, तो फाईल्स व आकडेवारी बघून निर्णय घेतो. तुमचा गोठा हे तुमचे कॉर्पोरेट ऑफिस आहे. ज्या गोठ्यात कागद व पेन नाही, तो गोठा कधीच नफ्यात जाऊ शकत नाही.

एका डेअरी CEO कडे रोजच्या रोज खालील 'नोंदी' (Key Performance Indicators - KPIs) असायलाच हव्यात:

- **उत्पादन व खर्चाचा ताळेबंद:** आज गोठ्यात एकूण किती किलो चारा व खुराक आला? व त्या बदल्यात आज किती लिटर दूध मिळाले? याला 'फीड कन्वर्जन रेशो' (Feed Conversion Ratio - FCR) म्हणतात.
- **जनावरांचे वैयक्तिक रेकॉर्ड:** फक्त गोठ्याचे एकूण दूध मोजू नका. प्रत्येक गाईचे दूध वेगळे मोजा. कोणती गाय किती दूध देते, ती कधी माजावर आली, तिला कधी कृत्रिम रेतन (AI) केले व तिची प्रसूती तारीख कोणती, याचे 'कॅलेंडर' भिंतीवर लावलेले असले पाहिजे.
- **आरोग्य व औषधांचा खर्च:** कोणत्या गाईला किती वेळा मस्टायटीस झाला व त्यावर किती खर्च झाला, याची नोंद ठेवा. यामुळे आजारी जनावरे वेळीच ओळखून त्यांना वगळणे सोपे जाते.




**3. 'कॅश फ्लो' व 'खाणाऱ्या मालमत्तेचे' (Eating Asset) व्यवस्थापन :**

इतर व्यवसायांमध्ये (उदा. कापड किंवा हार्डवेअर दुकान) माल निर्जीव असतो. बाजारात मंदी असली तर दुकानाला कुलूप लावले तरी चालते. पण पशुपालन हा 'बायोलॉजिकल बिझनेस' (जैविक व्यवसाय) आहे. इथली मालमत्ता (गाई/म्हशी) या श्वास घेणाऱ्या व 24 तास खाणाऱ्या 'लिव्हिंग इन्व्हेंटरी' आहेत. बाजारात दुधाला भाव नसला किंवा मालक आजारी असला, तरी गाईच्या शरीराला 'पॉज बटण' नसते. तिचे बायोलॉजिकल मीटर चालूच असते.

म्हणूनच, एका CEO प्रमाणे तुम्हाला नेहमी किमान 3 ते 6 महिन्यांच्या 'खेळत्या भांडवलाची' तरतूद करावी लागते. हंगामात जेव्हा मका किंवा चारा स्वस्त असतो, तेव्हा तो वर्षभरासाठी विकत घेऊन साठवणे (मुरघास बनवणे), हे स्मार्ट मॅनेजमेंट आहे. रोजच्या रोज बाजारातून महागडा चारा विकत आणलात, तर तुम्ही कधीच नफा कमवू शकणार नाही.



4. 'एच.आर.' व मजुरांचे स्मार्ट व्यवस्थापन : पशुपालनातील सर्वात मोठी डोकेदुखी म्हणजे 'मजूर न टिकणे'. एक सामान्य शेतकरी मजुरांवर फक्त ओरडतो, पण एक CEO त्यांना 'मॅनेज' करतो.

- इन्सेन्टिव्ह सिस्टीम: मजुरांना पगारासोबतच कामाचा मोबदलाही (Bonus) द्या. उदा. "जर महिन्यात गोठ्यात एकही गाईला मस्टायटीस झाला नाही, तर 500 रुपये अतिरिक्त बोनस मिळेल" किंवा "कालवड सुखरूप जन्माला आली तर बक्षीस मिळेल." यामुळे मजूर अधिक जबाबदारीने काम करतात.
- एस.ओ.पी. (Standard Operating Procedure): गोठ्यात काम करण्याची निश्चित वेळ व पद्धत ठरवून द्या. सड कसे धुवावे, इथपासून ते चारा किती वाजता टाकावा, याचे नियम (SOP) लिहून काढा व मजुरांना त्याचे प्रशिक्षण द्या.




5. रिस्क मॅनेजमेंट व 'बायोसिक्योरीटी': उद्योजक तोच असतो जो संकटे येण्याआधीच त्यांची भिंत बांधून तयार असतो.

- बायोसिक्युरीटी (Biosecurity): आपला गोठा म्हणजे एक सुरक्षित किल्ला असला पाहिजे. बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा वाहनाला निर्जंतुकीकरण केल्याशिवाय गोठ्यात प्रवेश देऊ नका. यामुळे लाळ्या-खुरकूत किंवा लंपीसारखे आजार गोठ्याबाहेरच रोखले जातात.
- लसीकरण व विमा: आजार आल्यावर उपचारांवर हजारो रुपये खर्च करण्यापेक्षा, आजार येण्याआधीच 'लसीकरण' (Vaccination) करणे हे स्मार्ट मॅनेजमेंट आहे. तसेच, गोठ्यातील जनावरांचा मृत्यू हा 'टोटल कॅपिटल लॉस' असतो. त्यामुळे प्रत्येक दुधाळ जनावराचा 'विमा' (Insurance) काढणे ही एका CEO ची पहिली अट असली पाहिजे. विमा हा खर्च नसून, शांत झोपेची किंमत आहे.







**उद्या गोठ्यात पाऊल ठेवताना...**

मित्रांनो, तुमचा गोठा तुम्हाला 100% श्रीमंत करू शकतो, फक्त त्याला चालवणारा 'मेंदू' कॉर्पोरेट असला पाहिजे. गोठ्यात राबणाऱ्या तुमच्या कष्टाळू हातांना आता एका 'व्यावसायिक दृष्टिकोनाची' जोड देण्याची वेळ आली आहे.

उद्या सकाळी जेव्हा तुम्ही गोठ्यात पाऊल ठेवाल, तेव्हा एक सामान्य शेतकरी म्हणून नाही, तर तुमच्या लाखो रुपयांच्या 'मिल्क फॅक्टरीचा' मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून पाऊल ठेवा. तुमच्या चालण्यात, नोंदी तपासण्यात व निर्णय घेण्यात तो आत्मविश्वास व रुबाब दिसला पाहिजे. तुमचा हा बदललेला दृष्टिकोनच तुमच्या गोठ्याला तोट्यातून नफ्याच्या शिखरावर घेऊन जाईल!




महापशुधन वार्ता

मुरघास (Silage) हा दुभत्या जनावरांसाठी उन्हाळ्यात व टंचाईच्या काळात संजीवनी मानला जातो. हिरवा चारा उपलब्ध असेल तेव्हा तो कापून, त्याची कुट्टी करून, हवा विरहित ठिकाणी आंबवून साठवून ठेवलेला चारा म्हणजे मुरघास. पशुपालनामध्ये जनावरांच्या आरोग्यासाठी व चांगल्या दूध उत्पादनासाठी वर्षभर हिरवा चारा मिळणे आवश्यक असते. परंतु, उन्हाळा व दुष्काळाच्या काळात हिरव्या चाऱ्याची मोठी टंचाई निर्माण होते. या समस्येवर मुरघास हा एक सर्वोत्तम, शास्त्रीय व किफायतशीर उपाय आहे. हिरवा चारा उपलब्ध असताना तो हवाबंद ठिकाणी आंबवून साठवणे म्हणजेच मुरघास तयार करणे होय.



**डॉ. सुनिल पसरटे**
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुआहार)
पशुसवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-67

**मुरघासाचे उपयोग**

- जेव्हा टंचाईकाळात हिरवे गवत मिळत नाही, तेव्हा हा चारा मुख्य आहार म्हणून वापरता येतो.
- हिरव्या चाऱ्याअभावी उन्हाळ्यात दुधाचे प्रमाण घटते, मुरघासामुळे दुधाचे उत्पादन वर्षभर स्थिर राहते.
- हा चारा सुक्या चाऱ्यासोबत किंवा कुट्टीसोबत मिक्स करून जनावरांना देता येतो.

**मुरघास बनवण्याची पद्धत:**

**1. पिकाची निवड:** मुरघासासाठी जास्त साखर (Cereals) असणारी पिके निवडावीत. मका (कणसासह) हा सर्वात उत्तम पर्याय आहे. याशिवाय ज्वारी, बाजरी किंवा हायब्रीड नेपिअर गवत वापरता येते.

**2. कापणीची वेळ:** मक्याचे पीक जेव्हा दूध अवस्थेत (कणसात दाणे भरू लागल्यावर) असते, तेव्हा त्याची कापणी करावी. कापलेला चारा 4-5 तास सावलीत सुकवून घ्या, जेणेकरून त्यातील ओलावा 65% ते 70% राहील. यावेळी चाऱ्यात 65% ते 70% ओलावा असतो.

**3. कुट्टी करणे:** यंत्राद्वारे 1 ते 2 सेंमी आकाराची कुट्टी करावी.

**4. साठवणूक व दाब देणे:** कुट्टी प्लास्टिक बॅगमध्ये किंवा जमिनीतील खड्ड्यात (सायलो पिट) भरावी. प्रत्येक 1 फुटाचा थर दिल्यानंतर तो पाय तुडवून किंवा ट्रॅक्टरच्या साहाय्याने घट्ट दाबावा, जेणेकरून त्यातील संपूर्ण हवा बाहेर निघून जाईल.

**5. जिवाणूंचे संवर्धन:** चाऱ्याची प्रत सुधारण्यासाठी थरावर गुळाचे पाणी किंवा Effective Microorganisms द्रावण शिंपडावे.

**6. हवाबंद करणे:** खड्डा किंवा बॅग पूर्ण भरल्यावर जाड प्लास्टिक कागदाने तोंड गच्च बांधून घ्यावे व त्यावर जड वस्तू (मातीची पोती किंवा दगड) ठेवाव्यात. 45 ते 50 दिवसांत मुरघास तयार होतो.

## मुरघास बनवण्याचे फायदे:

- **पौष्टिकते टिकून राहते:** हिरव्या चाऱ्यातील प्रथिने व जीवनसत्त्वे टिकून राहतात.
- **कमी जागा, जास्त साठवणूक:** वाळलेल्या चाऱ्यापेक्षा मुरघास साठवायला खूप कमी जागा लागते.
- **चारा वाया जात नाही:** जनावरे मुळापासून शेंड्यापर्यंत संपूर्ण मुरघास आवडीने खातात, यामुळे चाऱ्याची नासाडी शून्य होते.
- **पचनास सोपा:** आंबवण्याच्या प्रक्रियेमुळे हा चारा पचायला अत्यंत हलका व चवदार असतो.
- दुग्ध उत्पादनात वाढ: मुरघासामध्ये प्रथिने व कॅरोटीनचे प्रमाण चांगले असते. जनावरे आवडीने खातात, पचनास हलका असतो, ज्यामुळे दूध उत्पादनात 10% ते 15% वाढ होते.
- जागेची बचत: वाळलेल्या चाऱ्यापेक्षा मुरघासाला साठवण्यासाठी खूप कमी जागा लागते. 500 किलो चारा केवळ 1 घनमीटर जागेत साठवता येतो.
- दररोज चारा कापण्याची कटकट व वेळ वाचतो.

## जनावरांना मुरघास देण्याचे प्रमाण

- गाय व म्हैस: दररोज 20 ते 25 किलो (2 ते 3 वेळा विभागून).
- शेळी व मेंढी: दररोज 500 ते 700 ग्रॅम.

## टंचाईच्या काळात मुरघासाचा उपयोग

- **दुष्काळावर मात:** पावसाळा संपल्यावर किंवा कमी पाऊस पडल्यास हिरव्या चाऱ्याची टंचाई निर्माण होते. अशा वेळी आधीच बनवून ठेवलेला मुरघास जनावरांना जगवतो.
- **दीर्घकाळ टिकणारा:** योग्य पद्धतीने हवाबंद केलेला मुरघास 1 ते 2 वर्षांपर्यंत चांगला राहतो. त्यामुळे टंचाईच्या वर्षात हा साठा वर्षभर पुरतो. यामुळे चारा टंचाईच्या काळातही जनावरांचे आरोग्य व दुभती जनावरांची क्षमता अबाधित राहते.
- **बाजारातील महागड्या चाऱ्याला पर्याय:** टंचाईच्या काळात बाजारात हिरवा चारा खूप महाग होतो. स्वतः तयार केलेला मुरघास शेतकऱ्याचा मोठा खर्च वाचवतो.









उन्हाळ्यात किंवा दुष्काळात हिरव्या चाऱ्याची टंचाई ही दुग्ध व्यवसायातील सर्वात मोठी अडचण असते. अशा वेळी सुका चारा (पेंढा किंवा काड) हाच एकमेव पर्याय उरतो, पण तो पचायला जड व कमी दर्जाचा असतो. यावर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने एन्झाईम प्रक्रिया (Enzyme Treatment) हा एक अत्यंत सोपा, वेगवान व फायदेशीर पर्याय आहे. पारंपरिक पद्धतींच्या तुलनेत कमी वेळेत चाऱ्याची पचनक्षमता सुधारणारे हे तंत्रज्ञान चारा टंचाईच्या काळात वरदान आहे. पारंपरिक चारा प्रक्रियेला 10 ते 15 दिवस लागतात, परंतु एन्झाईम प्रक्रिया ही अवघ्या 30 मिनिटांत ते 1 तासात सुका चारा पौष्टिक बनवते. हे तंत्रज्ञान जनावरांची भूक वाढवण्यासाठी व उन्हाळ्यातील चारा टंचाईचा सामना करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरत आहे.



**डॉ. हर्षला ठुबे**
पशुधन विकास अधिकारी,
वैरण विकास, पसं-१४

**एन्झाईम ट्रीटमेंटची गरज:**
सुक्या चाऱ्यामध्ये (उदा. कडबा, पेंढा, कुटार, काड) लिग्निन व सेल्युलोजचे प्रमाण खूप जास्त असते. हे घटक जनावरांना पचायला अतिशय कठीण जातात. अशा चाऱ्यात प्रथिनांचे प्रमाण नगण्य असते. परिणामी, जनावरांचे पोट भरते पण त्यांना ऊर्जा किंवा प्रथिने मिळत नाहीत, ज्यामुळे जनावरे अशक्त होतात. एन्झाईम सोल्यूशन (उदा. सेल्युलोज, झायलेनेज एन्झाइम्स) या कठीण भागाचे (सेल्युलोज, हेमीसेल्युलोज) जलद विघटन करून त्याचे साध्या व विद्राव्य शर्करेत रूपांतर करतात. यामुळे चारा मऊ होतो व जनावरांना लवकर पचतो. या प्रक्रियेमुळे चाऱ्यात बंदिस्त असलेले कर्बोदके व प्रथिने जनावरांना सहज उपलब्ध होतात. यामुळे जनावरांच्या कोठीपोटातील फायदेशीर जिवाणूंची कार्यक्षमता वाढून पचनक्रिया गतिमान होते.

**महत्त्व व फायदे:** या प्रक्रियेनंतर अवघ्या 30 ते 60 मिनिटांत चारा जनावरांना खाऊ घालता येतो, जास्त काळ वाट पाहावी लागत नाही. तसेच चयापचय सुधारल्यामुळे जनावरांचे दूध उत्पादन व दुधातील फॅटचे प्रमाण वाढते. नेहमी वाया जाणारा किंवा जनावरे न खाणारा उरलेला निकृष्ट सुका चाराही जनावरे आवडीने व पूर्णपणे खातात. याबरोबरच कमी खर्चात जास्त पोषण मिळते कारण बाजारातील महागड्या पेंड व सप्लिमेंट्सवरील खर्च कमी होतो.

**वापरण्याची पद्धत:**
बाजारात मिळणारे प्रमाणित एन्झाईम सोल्यूशन (उदा. Fora ZYMTEM किंवा इतर) 2.5 मि.लि. घेऊन 10 लीटर पाण्यात नीट मिसळावे. हे 10 लीटरचे द्रावण 5 किलो सुक्या चाऱ्याच्या कुट्टीवर (किंवा 20 किलो हिरव्या चाऱ्यावर) स्प्रे पंपाच्या साहाय्याने समप्रमाणात फवारावे. फवारणी केल्यानंतर अर्धा ते एक तास चारा तसाच राहू द्यावा. 1 तासानंतर हा अत्यंत चवदार व मऊ झालेला चारा जनावरांना खाण्यास द्यावा.




सद्यस्थितीत उपलब्ध चाऱ्याचा प्रभावी वापर तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या चारा टंचाईवर मात करण्यासाठी टोटल मिक्स राशन (TMR) वर आधारित चारा ठोकळे (Fodder Blocks) तंत्रज्ञान अत्यंत वेगाने पुढे येत आहे. पिकांचे अवशेष व पोषक पूरक द्रव्यांचे संमिश्रण करून तयार केलेले हे मूल्यवर्धित ठोकळे कमी जागेत जास्त घनता (High Density) प्रदान करतात. परिणामी, यामुळे साठवणुकीच्या जागेत मोठी बचत होते व दूर अंतरावर चारा वाहून नेण्याचा वाहतूक खर्च कमालीचा कमी होतो. आपत्कालीन स्थितीत पशुधनाला संतुलित पोषण पुरवणारे हे एक शाश्वत माध्यम ठरत आहे.



श्री. आण्णा जगन्नाथ खरात
सहाय्यक संचालक
(वैरण विकास) पसं-१३
पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७

**चारा ठोकळे / फॉडर ब्लॉक म्हणजे काय?**

प्रक्रिया केलेले पिकांचे अवशेष (उदा. गव्हाचे कुटार, भाताचा पेंढा), हिरवा चारा व जनावरांसाठी आवश्यक असणारी पोषक द्रव्ये (खनिज मिश्रण, गूळ, मीठ व सप्लिमेंट्स) एकत्र करून, हायड्रॉलिक मशीनद्वारे अतिशय घट्ट दाबून तयार केलेल्या ढेप सारख्या घन ठोकळ्यांना चारा ठोकळे म्हणतात.

**चारा ब्लॉकचे महत्त्व व फायदे**

- **साठवणुकीची क्षमता:** सामान्य वैरण उघड्यावर विखुरलेला असतो व खूप जागा व्यापतो. ब्लॉक स्वरूपात वैरण अतिशय घट्ट दाबली जात असल्याने जागा 4 ते 5 पटीने कमी लागते.
- **वाहतूक खर्चात मोठी घट:** कमी जागेत जास्त चारा बसत असल्यामुळे ट्रॅक्टर किंवा ट्रकमधून चाऱ्याची वाहतूक करण्याचा खर्च कमी होतो. तसेच लांबच्या अंतरावर यांची वाहतूक करणे अतिशय सोपे जाते.
- **पोषक तत्वांचे संवर्धन:** संतुलित आहार तसेच गेग्ध उत्पादन व जनावरांचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या पोषक तत्वांनी हे ठोकळे परिपुर्ण असतात. यात खनिज मिश्रण व पूरक पोषक घटक मिसळलेले असल्यामुळे जनावरांना रोजच्या रोज संतुलित आहार मिळतो.
- **चारा टंचाईच्या काळात वरदान:** दुष्काळ किंवा उन्हाळ्यात जेव्हा चारा उपलब्ध नसतो, तेव्हा हे ठोकळे फॉडर बँक म्हणून जनावरांचे पोषण टिकवून ठेवतात.
- **कमी चारा अपव्यय:** सामान्यतः जनावरे वैरण पायाखाली तुडवून खराब करतात. ब्लॉक स्वरूपात दिल्यामुळे जनावरे हा चारा अजिबात वाया घालवत नाहीत, त्यामुळे संपूर्ण चाऱ्याचा योग्य वापर होतो व चाऱ्याची कोणतीही नासाडी होत नाही. उन्हाळ्यात किंवा पावसाळ्यात चारा खराब होण्याची शक्यता असते. हे ब्लॉक योग्य कोरड्या जागेत ठेवल्यास 6 महिने ते 1 वर्ष टिकतात.




**ठोकळे बनवण्याची कृती**

**1: चाऱ्याची कुट्टी करणे:** सर्वप्रथम गव्हाचा भुसा, भाताचा पेंढा किंवा सोयाबीनचे कुटार चाफ कटरच्या साहाय्याने बारीक करून घ्यावे.

**2: पौष्टिक द्रावण व मिश्रण तयार करणे (TMR)** बारीक केलेल्या चाऱ्यामध्ये खनिज मिश्रण, मीठ व पाणी, गुळाचे द्रावण मिक्सर मशीनमध्ये एकत्र करावे.

**3: हायड्रॉलिक मशीनमध्ये दाबणे:**

हे तयार झालेले एकजीव मिश्रण हायड्रॉलिक मशीनच्या साच्यामध्ये टाकले जाते.मशीनद्वारे प्रति चौरस इंचावर प्रचंड दाब (जवळपास 4000 ते 5000 पाउंड) दिला जातो. या दाबामुळे चाऱ्यामधील हवा पूर्णपणे निघून जाते व तो घट्ट होतो.

**4: पॅकिंग व साठवणूक:** साच्यातून बाहेर आलेले ठोकळे हे ओलावा शोषून घेणार नाहीत अशा प्लास्टिक फिल्म किंवा गोणपाटात व्यवस्थित पॅक करून कोरड्या जागी साठवून ठेवले जातात.

**चारा ठोकळे जनावरांना खाऊ घालण्याची पद्धत:** ठोकळा अतिशय घट्ट दाबलेला असतो. त्यामुळे जनावरांना तो थेट संपूर्ण मोठा ठोकळा म्हणून खाण्यास न देता फोडून थोडा मोकळा (भूसभुशीत) करून द्यावा.











**डॉ. हृषीकेश जगताप**
पशुवैद्यकीय अधिकारी,
पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे-67

दुग्ध व्यवसायात पशुपालकांचे सर्वात जास्त आर्थिक नुकसान करणारा आजार म्हणजे कासदाह / दगडी (Mastitis). पावसाळ्यात या आजाराचा प्रादुर्भाव गोठ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. कासदाह हा प्रामुख्याने जिवाणूंच्या (बॅक्टेरिया) संसर्गामुळे होणारा आजार असून, वेळीच काळजी न घेतल्यास जनावराची कास कायमची निकामी होऊ शकते. पावसाळ्यात गोठ्यामध्ये ओलावा असतो, आजूबाजूला चिखल व पाणी साचलेले असते. अशा दमट व अस्वच्छ वातावरणात रोगजंतूंची (उदा. स्ट्रेप्टोकोकस, स्टॅफिलोकोकस, ई-कोलाय) वाढ अतिशय वेगाने होते. जनावरे जेव्हा अशा अस्वच्छ जागेवर बसतात, तेव्हा कासेच्या सडामार्फत (Teat canal) हे जिवाणू आत प्रवेश करतात व कासदाह होतो.

**कासदाह टाळण्यासाठी तांत्रिक व प्रतिबंधात्मक उपाय**

कासदाहावर उपचार करण्यापेक्षा तो होऊ न देणे , हे नेहमीच फायद्याचे ठरते. यासाठी खालील तांत्रिक व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे:

1. गोठ्याचे व्यवस्थापन व स्वच्छता

- कोरडा गोठा: पावसाळ्यात गोठ्यातील जमीन कोरडी राहील याची काळजी घ्यावी. गोठ्यात पाणी साचू देऊ नये. पाण्याचा निचरा योग्य प्रकारे व्हावा.
- निर्जंतुकीकरण: आठवड्यातून किमान दोन वेळा गोठ्यात चुना व ब्लिचिंग पावडरची धुरळणी करावी.
- मलमूत्राची विल्हेवाट: शेण व लघवी वेळच्या वेळी काढून गोठा स्वच्छ ठेवावा जेणेकरून माश्या व डासांचा प्रादुर्भाव होणार नाही.

2. दूध काढण्याची शास्त्रीय पद्धत

- कासेची स्वच्छता: दूध काढण्यापूर्वी कास व सड कोमट पाण्याने किंवा पोटॅशियम परमँगनेटच्या सौम्य द्रावणाने स्वच्छ धुवून घ्यावेत व कोरड्या, स्वच्छ कपड्याने पुसून काढावेत.
- पूर्ण हात पद्धत: दूध काढताना अंगठा दुमडून दूध काढू नये. नेहमी पूर्ण हात पद्धतीने व वेगाने (5 ते 7 मिनिटांत) दूध काढून घ्यावे.
- संपूर्ण दूध काढणे: कासेमध्ये दूध शिल्लक राहू देऊ नये. कासेत दूध राहिल्यास जिवाणूंना वाढीस पोषक वातावरण मिळते.

3. टीट डिपिंग (Teat Dipping) : सर्वात महत्त्वाचा उपाय

दूध काढल्यानंतर सडाचे छिद्र साधारण 20 ते 30 मिनिटे उघडे असते. याच काळात जिवाणू आत शिरण्याचा धोका सर्वाधिक असतो.




- दूध काढून झाल्यानंतर लगेचच आयोडीनयुक्त द्रावणात (उदा. पोव्हिडॉन आयोडीन - Povidone Iodine) सड बुडवावेत.
- या प्रक्रियेला 'टीट डिपिंग' म्हणतात. यामुळे सडाच्या बाहेरील रोगजंतू नष्ट होतात व छिद्र बंद होईपर्यंत जंतुसंसर्ग होत नाही.
- दूध काढल्यानंतर जनावराला किमान अर्धा तास खाली बसू देऊ नये. त्यासाठी जनावरांपुढे लगेच हिरवा चारा टाकावा.



टीट डिपिंग कप

# कॅलिफोर्निया मॅस्टाइटिस टेस्ट
# ( स्तनदाह / दगडी रोग तपासणी)

**दुभत्या जनावरांच्या सडांमधील संसर्ग तपासण्याची पद्धत खालीलप्रमाणे आहे:**

1



**१. दूध नमुने गोळा करा:** जनावराच्या प्रत्येक सडातून स्वतंत्र कप्प्यांमध्ये थोडे दूध काढा.

2



**२. जास्तीचे दूध ओता:** कप्प्यांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त झालेले दूध ओतून कमी करा.

3



**३. द्रावण टाका:** दुधाच्या बरोबरीने सारख्या प्रमाणात 'CMT सोल्यूशन' मिक्स करा.

4



**४. पॅडल फिरवा:** पॅडल आडवे धरून हळूवार गोल फिरवा आणि खालील तक्त्यानुसार निकाल तपासा.

| दुधाची स्थिती (Inference) | CMT स्कोअर | सोमॅटिक सेल काउंट (प्रति मि.ली.) | निष्कर्ष (Interpretation) |
|---|---|---|---|
| नेहमीसारखे पातळ दूध किंवा राखाडी रंग | N (Negative) | ० ते २,००,००० | निरोगी सड (Healthy Quarter) |
| ढवळल्यानंतर लगेच नाहीसा होणारा हलका जेल किंवा जांभळट राखाडी रंग | T (Trace) | २,००,००० ते ४,००,००० | सुप्त स्तनदाह (सुरुवातीची लक्षणे) |
| न विरघळणारा हलका जेल, तुकडे पडणारे धागे किंवा जांभळा राखाडी रंग | 1 | ४,००,००० ते १२,००,००० | सुप्त स्तनदाह (Subclinical Mastitis) |
| कप्प्याच्या तळाशी त्वरित घट्ट आणि अत्यंत चिकट थर तयार होणे | 2 | १२,००,००० ते ५०,००,००० | दगडी आजार (Clinical Mastitis) |
| अंड्याच्या पांढऱ्या भागासारखा अतिशय घट्ट जेल आणि गडद जांभळा रंग | 3 | ५०,००,००० पेक्षा जास्त | गंभीर स्वरूपाचा दगडी आजार (संसर्ग) |

### 4. लवकर निदान (Early Diagnosis - CMT Test)

आजाराची सुरुवातीची अवस्था (Sub-clinical Mastitis) डोळ्यांना दिसत नाही, पण दुधात संसर्ग सुरु झालेला असतो. यासाठी कॅलिफोर्निया मस्टायटिस टेस्ट (CMT - California Mastitis Test) चा वापर करावा.

- ❖ या चाचणीत एका विशिष्ट प्लेटमध्ये चारही सडांतील थोडे दूध घेऊन त्यात 'सीएमटी' द्रावण मिसळले जाते.
- ❖ जर दुधाचा घट्ट जेल (Gel) तयार झाला, तर कासदाह सुरु झाला आहे असे समजावे व त्वरित पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.

### 5. आहार व प्रतिकारशक्ती (Nutrition & Immunity)

- ➢ जनावराची रोगप्रतिकारशक्ती चांगली असल्यास आजाराचा धोका कमी असतो.
- ➢ पावसाळ्यात आहारात चांगल्या प्रतीचे खनिज मिश्रण (Mineral Mixture) 50 ग्रॅम रोज द्यावे.
- ➢ विशेषतः 'व्हिटॅमिन ई' (Vitamin E) व 'सेलेनियम' (Selenium) युक्त आहार दिल्यास कासेच्या पेशी बळकट होतात व आजारास प्रतिबंध होतो.

### महत्त्वाच्या सूचना

- ❑ जर एखाद्या जनावराला कासदाह झालाच, तर त्याचे दूध सर्वात शेवटी काढावे व ते दूध निरोगी जनावरांच्या दुधात मिसळू नये. गोठ्याचे निर्जंतुकीकरण करावे.
- ❑ उपचारासाठी तातडीने पशुवैद्यक यांच्याशी संपर्क साधावा. व प्रतिजैविकांचा (Antibiotics) कोर्स पूर्ण करावा.
- ❑ अर्धवट उपचार केल्यास आजार पुन्हा उद्भवू शकतो.

# मानेगाव बाजार येथे शेळी संकलन केंद्रास भेट:

## ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'गोट ॲग्रिगेशन मॉडेल' दिशादर्शक



**नागपूर:** पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त मा. डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार भंडारा जिल्ह्यातील मानेगाव बाजार येथील 'शेळी संकलन केंद्रास' (Goat Aggregation Centre) विशेष पाहणी भेट देण्यात आली. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत उभारण्यात आलेल्या या केंद्राचा अभ्यास करून, 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता कार्यक्रमा'अंतर्गत हे मॉडेल शाश्वत व मोठ्या प्रमाणावर राबवण्यायोग्य कसे ठरवता येईल, याची चाचपणी या भेटीदरम्यान करण्यात आल्याची माहिती प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर विभाग डॉ. सतीश राजू यांनी दिली.

नागपूर विभागातील 40,000 महिला शेळीपालकांना एकत्र आणून, त्यांना वैज्ञानिक शेळीपालन, सुधारित व्हेटर्नरी सपोर्ट (वैद्यकीय सेवा), उत्कृष्ट प्रजननाची पद्धत व थेट संघटित बाजारपेठ उपलब्ध करून देणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

### उपक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये व आगामी योजना:

- **स्वच्छ व आधुनिक मटण विक्री केंद्र:** या एकात्मिक मूल्य साखळी (Integrated Value Chain) अंतर्गत येत्या महिन्यात पहिले हायजिनिक (स्वच्छ व आरोग्यदायी) रिटेल शेळी मटण विक्री केंद्र सुरु होत आहे.
- **मांस प्रक्रिया उद्योग:** भविष्यात येथे एक आधुनिक मांस प्रक्रिया युनिट (Modern Meat Processing Unit) स्थापन करण्याचे नियोजन आहे, ज्यामुळे स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल.
- **आर्थिक सक्षमीकरण:** या साखळीमुळे ग्रामीण भागातील महिला शेळीपालकांच्या उत्पन्नात शाश्वत वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होणार आहे.

### शाश्वत ग्रामीण विकासाचा वस्तुपाठ:

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पशुसंवर्धन विभाग व **गोटवेल प्रोड्युसर कंपनी लिमिटेड** यांच्यातील हा परस्पर सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहे. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता कार्यक्रमा'अंतर्गत उद्योजकतेवर आधारित ग्रामीण विकासाचे हे एक अत्यंत यशस्वी, शाश्वत व राज्यभर राबवण्यायोग्य मॉडेल ठरेल, असा विश्वास पशुसंवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



# लिंग विनिश्चित रेतमात्रा
# (Sex Sorted Semen - SSS)

## दुग्धव्यवसायातील प्रगतीचे आधुनिक तंत्रज्ञान





**या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मादी वासरू (कालवड) जन्माला येण्याची शक्यता ९० टक्क्यांपेक्षा अधिक असते.**

### लिंग विनिश्चित रेतमात्राचे प्रमुख फायदे

- ✔ **जास्तीत जास्त कालवडींचा जन्म**
  मादी वासरांच्या जन्माची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते. परिणामी, दूध उत्पादनासाठी उपयुक्त जनावरांची संख्या जलदगतीने वाढते.
- ✔ **अनुवांशिक सुधारणेला चालना**
  उच्च वंशावळीच्या वळूंच्या रेतमात्रांचा वापर केल्यामुळे जन्माला येणाऱ्या कालवडींची दूध उत्पादन क्षमता त्यांच्या मातेपेक्षा अधिक असण्याची शक्यता वाढते.
- ✔ **नर वासरांच्या संगोपनावरील खर्चात बचत**
  दुग्धव्यवसायात नर वासरांवर होणारा संगोपन खर्च वाचतो आणि व्यवसाय फायदेशीर ठरतो.
- ✔ **कष्टप्रसूतीमध्ये घट**
  कालवडींचा आकार नर वासरांच्या तुलनेत लहान असल्याने **विण्याच्या** वेळी होणारा त्रास कमी.
- ✔ **दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर**
  उच्च आनुवांशिक क्षमता असलेल्या कालवडींची संख्या वाढल्याने भविष्यातील दूध उत्पादन व आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होते.



### दुग्धव्यवसायातील क्रांतिकारी पाऊल

हे आधुनिक व वैज्ञानिक तंत्रज्ञान मादी वासरांच्या जन्माची शक्यता वाढवते, अनुवांशिक सुधारणेला गती देते, पशुधनाची उत्पादकता वाढवते आणि दुग्धव्यवसाय अधिक शाश्वत व नफाक्षम बनवते.

**– डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.)
महाराष्ट्र राज्य

### लिंग विनिश्चित रेतमात्रा वापरताना घ्यावयाची काळजी:

- ✔ शक्यतो कालवडी, प्रथम किंवा दुसऱ्या वेताच्या गाईमध्येच वापर करावा.
- ✔ वारंवार उलटणाऱ्या गाई अथवा म्हशींमध्ये वापर टाळावा.
- ✔ जनावरे प्रजननक्षम, निरोगी व संतुलित आहारावर असावीत.
- ✔ कृत्रिम रेतनासाठी योग्य माज ओळखून योग्य वेळेतच रेतन करावे.
- ✔ प्रजननासंबंधी कोणताही दोष नसलेल्या जनावरांमध्ये वापर केल्यास यशाचे प्रमाण वाढते.

## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना

**100% टक्के अनुदानावर**

## लिंग विनिश्चित रेतमात्रा उपलब्ध

**अनुदानाचे स्वरूप :**
सर्व प्रवर्गातील पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर लिंग विनिश्चित रेतमात्रा उपलब्ध

**टीप :** कृत्रिम रेतनासाठी शासनाने विहित केलेले सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक आहे.

### अधिक माहितीसाठी

पशुसंवर्धन विभाग कॉल सेंटर : १९६२
व्हॉट्सअप चॅटबॉट सेवा : **9063142299**

**आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करा, अधिक कालवडी मिळवा, दुग्धव्यवसाय समृद्ध करा!**



सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग



# भ्रूण प्रत्यारोपण (ET-IVF) तंत्रज्ञान

दुग्धव्यवसायातील क्रांती व प्रगतीची नवी दिशा

## ET-IVF म्हणजे काय?

- हे तंत्रज्ञान म्हणजेच पशुपालनातील 'टेस्ट ट्यूब बेबी' होय. याचा वापर कमी दूध उत्पादन असलेल्या पशुधनापासून उच्च उत्पादन क्षमता असलेल्या वासराच्या जन्मासाठी केला जातो.
- या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उच्च वंशावळीच्या गाईचे स्त्रीबीज एका विशिष्ट उपकरणाच्या सहाय्याने बाहेर काढून सदरचे स्त्रीबीज प्रयोगशाळेत आपल्याला पाहिजे त्या वळूच्या वीर्याच्या सहाय्याने फलित केले जाते व तयार होणारे भ्रूण दायी (सरोगेट) गाई / म्हशीच्या गर्भाशयात प्रत्यारोपित केले जातात.
- सर्वसाधारणपणे नैसर्गिकरित्या एका गाई / म्हशीपासून १ वर्षात १ वासरू निर्माण करू शकतो, परंतु या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उच्च आनुवंशिक गुणधर्म असणाऱ्या एकाच गाईपासून दायी गाईच्या मदतीने एका वर्षात ४० ते ५० उच्च वंशावळीच्या वासरांची निर्मिती करणे शक्य होते.
- लिंग निर्धारित वीर्याचा वापर करून ९० टक्क्यांहून अधिक फक्त कालवडीची पैदास करणे व त्यामुळे लिंग निर्धारित वीर्याचा योग्य आणि पूर्ण कार्यक्षमतेने वापर करणे शक्य आहे. ज्यामुळे नर वासरे जोपासण्याचा खर्च कमी होऊ शकेल.

## मुख्य फायदे

- उच्च आनुवंशिकता
  जास्त दूध उत्पादन
- दायी गाईच्या मदतीने एकाच वर्षात
  **४० ते ५०**
  उच्च वंशावळीची वासरे
- लिंग निर्धारित वीर्यामुळे
  **९०% पेक्षा अधिक**
  फक्त कालवडीची पैदास
- नर वासरे जोपासण्याचा खर्च कमी – नफा अधिक
- समृद्ध दुग्धव्यवसायाची शाश्वत दिशा

## भ्रूण प्रत्यारोपण (ET-IVF) प्रक्रिया

1. स्त्रीबीज संकलन → 2. प्रयोगशाळेत स्त्रीबीज फलित करणे → 3. तयार भ्रूण → 4. प्रत्यारोपण → 5. उच्च वंशावळीची कालवड











## भ्रूण प्रत्यारोपण (ET-IVF) प्रक्रियेसाठी अनुदान

**अनुदान**

**₹ 24,000/-** मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतर्गत

उच्च आनुवंशिक वंशावळीच्या गर्भापासून खात्रीशीर गर्भधारणेसाठी

सर्व प्रवर्गासाठी **१०० टक्के**

- भ्रूण प्रत्यारोपण करण्यासाठीचे विहित करण्यात आलेले सेवाशुल्क, तसेच पात्र गाईची निवड करण्यासाठी आवश्यक तपासणीचे सेवाशुल्क पशुपालकाला अदा करणे आवश्यक.



## योजनेच्या अधिक माहितीसाठी

नजीकचा पशुवैद्यकीय दवाखाना

कॉल सेंटर क्र.: **1962**

व्हॉट्स ॲप चॅटबॉट सेवा: **9063142299**

उच्च आनुवंशिकता • जास्त उत्पादन • अधिक नफा • समृद्ध दुग्धव्यवसाय

# तुमच्या गाई-म्हशींचे
# उज्ज्वल भविष्य

**सुरक्षित प्रजननाचा खात्रीशीर मार्ग**

**नोंदणीकृत कृत्रिम रेतन (AI) तंत्रज्ञांकडूनच रेतन करून घ्या!**



**तज्ञांची निवड - जनावरांचे आरोग्य, जास्त दूध, जास्त नफा आणि शाश्वत प्रगतीची जोड!**

## नोंदणीकृत AI तंत्रज्ञांकडून रेतन केल्याचे फायदे

**उत्कृष्ट आनुवंशिकतेची खात्री**
उत्तम वंशावळ असलेल्या वळूंच्या वीर्याद्वारे दूध उत्पादन, वाढ व प्रजनन क्षमता वाढते.

**जनावरांचे आरोग्य सुरक्षित**
स्वच्छता, निर्जंतुकीकरण व योग्य तंत्रामुळे संसर्गाचा धोका कमी.

**उत्पादनात वाढ, नफा अधिक**
चांगले जनावर = जास्त दूध, चांगले वासरू, आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट!

**जास्त गर्भधारणा यश दर**
प्रशिक्षित तंत्रज्ञ योग्य पद्धतीने रेतन करतात, म्हणून गर्भधारणा होण्याची शक्याता अधिक.

**वेळ व खर्चाची बचत**
वारंवार होणाऱ्या अपयशी रेतनांपासून बचत आणि उत्पादनात वाढ.

**नोंदणीकृत तंत्रज्ञांची खात्रीशीर सेवा**
प्रशिक्षित, पात्र व शासनमान्य तंत्रज्ञांकडून विश्वसनीय व जबाबदार सेवा.

## नोंदणीकृत नसलेल्या व्यक्तीकडून रेतन केल्यास धोके

- गर्भधारणा न होणे किंवा वारंवार अपयश
- जनावरांना संसर्ग व आजारांचा धोका
- उत्पादनात घट व आर्थिक नुकसान
- वेळ, पैसा आणि मेहनतीचा अपव्यय



**नेहमी विचार करा, AI तंत्रज्ञ नोंदणीकृत आहे का?**

नोंदणी क्रमांक विचारा आणि मगच रेतन करून घ्या.

## निरोगी वासरे, समृद्ध पशुधन, समृद्ध शेतकरी !

नोंदणीकृत एआय तंत्रज्ञ आणि इतर माहितीसाठी भेट द्या
www.mbbra.com

तुमच्या पशुधनाच्या उज्ज्वल भविष्यासाठी
**नोंदणीकृत AI तंत्रज्ञांचीच निवड करा.**

प्रशिक्षित व पात्र तंत्रज्ञ | गुणवत्तापूर्ण रेतमात्रांचा वापर | जनावरांचे आरोग्य आमची जबाबदारी

## महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण

पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-411067
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**"पशुधन सुदृढ, तर शेतकरी समृद्ध!"**



# गर्भधारणा केल्यानंतर गाय केव्हा विणार?



## ( अंदाजे तारीख ) २७५ ते २८० दिवस

| कृत्रिम रेतनाची तारीख | विण्याची तारीख | कृत्रिम रेतनाची तारीख | विण्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ जानेवारी | ०८ ऑक्टोबर | ०८ जुलै | १२ एप्रिल |
| ०७ जानेवारी | १४ ऑक्टोबर | १५ जुलै | १९ एप्रिल |
| १४ जानेवारी | २१ ऑक्टोबर | २२ जुलै | २६ एप्रिल |
| २१ जानेवारी | २८ ऑक्टोबर | २९ जुलै | ०३ मे |
| २८ जानेवारी | ०४ नोव्हेंबर | ०५ ऑगस्ट | १० मे |
| ०४ फेब्रुवारी | ११ नोव्हेंबर | १२ ऑगस्ट | १७ मे |
| ११ फेब्रुवारी | १८ नोव्हेंबर | १९ ऑगस्ट | २४ मे |
| १८ फेब्रुवारी | २५ नोव्हेंबर | २६ ऑगस्ट | ३१ मे |
| २५ फेब्रुवारी | ०१ डिसेंबर | ०२ सप्टेंबर | ०७ जून |
| ०४ मार्च | ०८ डिसेंबर | ०९ सप्टेंबर | १४ जून |
| ११ मार्च | १५ डिसेंबर | १६ सप्टेंबर | २१ जून |
| १८ मार्च | २२ डिसेंबर | २३ सप्टेंबर | २८ जून |
| २५ मार्च | २९ डिसेंबर | ३० सप्टेंबर | ०५ जुलै |
| ०१ एप्रिल | ०५ जानेवारी | ०७ ऑक्टोबर | १२ जुलै |
| ०८ एप्रिल | १२ जानेवारी | १४ ऑक्टोबर | १९ जुलै |
| १५ एप्रिल | १९ जानेवारी | २१ ऑक्टोबर | २६ जुलै |
| २२ एप्रिल | २६ जानेवारी | २८ ऑक्टोबर | ०२ ऑगस्ट |
| २९ एप्रिल | ०२ फेबुवारी | ४ नोव्हेंबर | ०९ ऑगस्ट |
| ०६ मे | ०९ फेबुवारी | ११ नोव्हेंबर | १६ ऑगस्ट |
| १३ मे | १६ फेबुवारी | १८ नोव्हेंबर | २३ ऑगस्ट |
| २० मे | २३ फेबुवारी | २५ नोव्हेंबर | ३० ऑगस्ट |
| २७ मे | ०१ मार्च | २ डिसेंबर | ०६ सप्टेंबर |
| ०३ जून | ०८ मार्च | ९ डिसेंबर | १३ सप्टेंबर |
| १० जून | १० मार्च | १६ डिसेंबर | २० सप्टेंबर |
| १७ जून | २२ मार्च | २३ डिसेंबर | २७ सप्टेंबर |
| २४ जून | २९ मार्च | ३० डिसेंबर | ०३ ऑक्टोबर |
| ०१ जुलै | ०४ एप्रिल | | |



डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

• सशक्त पशुधन • समृद्ध पशुपालक • संपन्न महाराष्ट्र

पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

## पशुधन विमा योजना

आपल्या पशुधनाच्या सुरक्षित भविष्याची खात्री

## राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार २०२६

उत्कृष्ट गोपालकांचा सन्मान, प्रेरणेचा मानबिंदू

गोपालरत्न

## पशुधनाची काळजी, आपल्या समृद्धीची हमखास गॅरंटी !

## पशुवैद्यकीय सेवांसाठी कॉल सेंटर

**१९६२**

तज्ज्ञांचा सल्ला, आपल्या सेवेसाठी २४x७

## व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट

**9063142299**

त्वरीत माहिती, सोपे समाधान

## लसीकरण

रोगमुक्त पशुधन, निरोगी भारत समृद्ध भारत

- रोगप्रतिबंधक उपाययोजना
- तज्ज्ञांचे मार्गदर्शन वेळेवर उपचार
- उत्पादनवाढ उत्पन्नवाढ
- पशुधन कल्याण आपली जबाबदारी

**पशुसंवर्धन विभाग**
महाराष्ट्र शासन
www.ahd.maharashtra.gov.in
/MahaAHD

पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे - ४११०६७
०२०-२५६९०४८४
mahapshudhanvarta@gmail.com

सर्व अंक वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

MAHAPASHUDHANVARTA